## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्कः- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ८९ | शनिवार, दि. १७ मे २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सितराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334


# ... तर पवारांचे नाव आदरणीय राहिल !

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून शरद पवार यांचे कौतूक

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : शरद पवार यांच्याबद्दल सांगण्याची आवश्यकताच नाही की भारतीय क्रिकेटच्या इतिहासात आणि क्रिकेटचे जे प्रशिक्षक असतील त्यांच्यात शरद पवार यांचे नाव नेहमीच आदरणीय राहील. बीसीसीआय असेल किंवा आयसीसी असेल यात शरद पवार यांचे योगदान फार मोठे आहे. त्यामुळे एमसीएने शरद पवार यांच्या नावाचे स्टँड उभारण्याचा जो निर्णय घेतला आहे याचे मी स्वागत करतो आणि अभिनंदन करतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

मुंबई येथील प्रसिद्ध वानखेडे स्टेडियम येथे नामकरण सोहळा पार पडला. यावेळी क्रिकेटपटू रोहित शर्मा तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नावाच्या स्टँडचे उद्घाटन करण्यात आले. अजित वाडेकर यांच्याही नावाचे स्टँड यावेळी उभारण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शरद पवार एकाच मंचावर दिसून आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले, अतिशय ज्येष्ठ नेते ज्यांचे क्रिकेटमधील योगदान नेहमीच लक्षात राहील असे शरद पवार साहेब तसेच आपल्या बॅटिंगने मंत्रमुग्ध करणारे रोहित शर्मा, दिलीप वेंगसरकर, अजित वाडेकर यांचे कुटुंबीय आणि उपस्थित सर्व क्रिकेटप्रेमी भगिनी आणि बंधूंनो मी तुमच्या सर्वांचे स्वागत करतो. मी एम सीएने घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत करतो.

माझे मित्र अमोल काळे यांनी एमसीएमध्ये महत्त्वपूर्ण काम केले आहे. अमोल काळे यांना ईश्वराने अचानक नेले पण त्यांनी पाहिलेले स्वप्न एमसीए नक्कीच पूर्ण करेल. एमसीए लौंजला त्यांचे नाव देण्यात आले आहे. तसेच रोहित शर्मा म्हणजे जे मैदानात आल्यावर मैदान दणाणून सोडतात. त्यांनी अशा दोन स्पर्धा जिंकवून दिल्या आहेत, ज्या आपल्या इच्छा अपूर्ण राहिल्या होत्या त्या त्यांनी पूर्ण करून दाखवल्या. त्यांचे मैदानात मोकळेपणे वागणे अशी त्यांची ओळख आहे. त्यांनी अतिशय लीलया या ठिकाणी कर्णधार म्हणून सगळ्या फॉरमॅटमध्ये अतिशय सुंदर आहे. आम्ही आता वाट पाहत आहोत की त्यांचा एक शॉट कधी रोहित शर्मा स्टँडला जाऊन लागतो याची आम्हा सर्वांनाच उत्सुकता असणार आहे. मला विश्वास आहे की यामुळे ते अधिक चांगले आणि अधिक काळ खेळतील. रोहित शर्मा म्हणाला, सर्वप्रथम मी सर्वांचे आभार मानू इच्छितो, आमच्यासाठी हा एक खास दिवस आहे. आज जे घडणार आहे, त्याचे स्वप्न मी कधी पाहिले नव्हते. हे इतर कोणत्याही खेळाडूसारखे आहे ज्यांना त्यांचे सर्वोत्तम काम करायचे आहे, देशाची सेवा करायची आहे.



### स्टेडियमसाठी अनेकजण सोबत : पवार

मी राज्यात क्रीडा मंत्री होतो तेव्हा जागा देण्यापासून ते स्टेडियम उभारण्यात अनेकजण सोबत होते. या स्टेडियमला एक इतिहास आहे. काही सहकाऱ्यांचे स्मरण होणे आवश्यक आहे. सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री यांचे योगदान नोंदणीय आहे, असे शरद पवार म्हणाले.

### क्रिकेटची पंढरी वानखेडे : मुख्यमंत्री फडणवीस

लॉर्ड ही क्रिकेटची पंढरी आहे. परंतु खरी पंढरी ही वानखेडे आहे. पंढरी तिथे देव त्या अर्थाने वानखेडे येथे सचिन तेंडुलकरचा पुतळा आहे. वानखेडे पेक्षा मोठे स्टेडियम उभारण्याची जागा आम्ही उपलब्ध करून देऊ जिथे एक लाख प्रेक्षक बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले आहे. चार वर्षांनी एमसीएला शंभर वर्ष पूर्ण होतील त्यावेळी अजून एक नवीन स्टेडियम उभारले जाईल, असा आपण प्रयत्न करू. या अतिशय सुंदर कार्यक्रमात तुम्ही मला बोलावले हा मी माझा सन्मान समजतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## संमिश्र

### ऑपरेशन सिंदूर संपले नाही: राजनाथ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहमदाबाद** : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही, हा फक्त एक ट्रेलर आहे, वेळ आल्यावर आम्ही जगाला संपूर्ण चित्रपट दाखवू. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह शुक्रवारी पहिल्यांदाच गुजरातमधील भूज हवाई दल तळावर पोहोचले. सध्याच्या युद्धबंदीमध्ये आम्ही पाकिस्तानला त्याच्या वर्तनाच्या आधारावर प्रोबेशनवर ठेवले आहे. जर त्यांच्या वर्तनात काही अडथळा आला तर कठोर कारवाई केली जाईल.

### हाँगकाँगमध्ये आढळले कोरोनाचे ३१ रुग्ण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**हाँगकाँग** : हाँगकाँग आणि सिंगापूरमध्ये कोरोनाव्हायरसचे रुग्ण पुन्हा वाढू लागले आहेत. ३ मे पर्यंत, हाँगकाँगमध्ये कोरोना संसर्गाची ३१ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. यामध्ये अनेक मृत्यूंचाही समावेश आहे. सिंगापूरनेही कोविड अलर्ट जारी केला आहे आणि यावर्षी कोरोना प्रकरणांबद्दल पहिले अपडेट जारी केले आहे.

### बीडमध्ये भीषण कंटेनरचा अपघात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड** : बीड येथे भीषण अपघात झाला आहे. भरधाव कंटेनरने आठ ते दहा वाहनांना धडक दिली असून यात एका महिलेचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले आहेत. बीड जिल्ह्यातील केज येथे ही घटना घडली आहे. या भीषण अपघातानंतर येथील संतप्त जमावाने कंटेनरला आग लावल्याची देखील घटना समोर आली आहे.


### चालकाने काढली मुलीची छेड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : राज्यात महिला अत्याचार, छेडकाढण्याचे प्रकार वाढले आहेत. अशीच एक संतापजनक घटना मुंबईून समोर आली आहे. मुंबईत एका उबेर चालकाने १४ वर्षीय मुलीला निर्जनस्थळी नेत तिची छेड काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अल्पवयीन मुलगी प्रभादेवीपासून उबेरमध्ये बसली होती. आरोपी चालकाने दिलेल्या पत्त्यावर न जाता कार थेट इस्टर्न एक्सप्रेस हायवेवर निर्जनस्थळी नेली, तिथे मुलीची छेड काढली आहे.




# आ. कदमांनी घेतली जगतापांची सांत्वनपर भेट



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते स्व. माजी आ. अरुणकाका जगताप यांच्या निवासस्थानी नुकतीच काँग्रेसचे आमदार आणि महाराष्ट्राचे माजी उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांनी सांत्वनपर भेट घेतली. त्यांनी स्व. अरुणकाका जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या भेटी दरम्यान आ. संग्राम जगताप, माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांच्यासह कुटुंबीयांची त्यांनी विचारपूस केली आणि दुःखात सहभागी होत कुटुंबाला धीर दिला.

आ. डॉ. कदम म्हणाले की, स्व. जगताप हे केवळ राजकारणातले नेता नव्हते, तर ते एक प्रभावी समाजसेवक होते. आजच्या युवा पिढीने स्व. अरुणकाकांचे विचार आत्मसात करावे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्याचा वारसा संग्राम जगताप आणि सचिन जगताप निश्चितच पुढे नेत आहेत. त्यांच्या माध्यमातून जगताप कुटुंबीयांचे सामाजिक योगदान अधिक प्रभावीपणे दिसून येत आहे.

स्व. अरुणकाका जगतापांचा अहिल्यानगर शहराच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असल्याचेही आमदार कदम यांनी नमूद केले. त्यांच्या नेतृत्वात शहरात विविध विकासकामे झाली. नागरिकांशी त्यांनी कायम स्नेहसंबंध ठेवले. त्यांच्या निधनाने जिल्ह्याने एक सच्चा समाजसेवक गमावल्याचे दुःख त्यांनी व्यक्त केले.

# ...अबब ड्रग्जनंतर आता लाखोंचाही गांजा जप्त

## श्रीरामपुरात ड्रग्जसह गांजाचे मोठे रॅकेट; शहर पोलिसांची धडक कारवाई



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहर पोलिसांनी अमली पदार्थ विरोधी कारवाईचा धडाका सुरूच ठेवला असून, कोट्यवधी रुपयांच्या ड्रग्ज जप्तीनंतर सलग दुसऱ्या दिवशी मोठी कारवाई करत लाखो रुपयांचा गांजा जप्त केला आहे.

श्रीरामपूर-पुणतांबा मार्गावर गुरुवारी रात्री उशिरा ही कारवाई करण्यात आली. २०१ किलो गांजासह दोघा आरोपींना अटक करण्यात आली असून, गुन्ह्यात वापरलेली महिंद्रा एक्सयुव्ही ५०० गाडी आणि गांजा असा एकूण अंदाजे ४० लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईने शहरात अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. रमेश जाधव आणि ज्ञानेश्वर जाधव अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून हे दोघे गांजा विक्रीसाठी श्रीरामपूर येथे घेऊन येत असल्याची गुप्त माहिती शहर पोलिसांना मिळाली

पान ४

### जिल्ह्यात मोठे रॅकेट, मास्टरमाईंड शोधा?

श्रीरामपूर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात ड्रग्स आणि गांजा उपलब्ध होत असल्याचे दोन दिवसांत झालेल्या कारवाईवरून दिसून येते. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह श्रीरामपूर तालुक्यामध्ये ड्रग्स आणि गांजाचे मोठे रॅकेट असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे ड्रग्स आणि गांजा विक्री करणाऱ्या आरोपींची कसून चौकशी केल्यास या रॅकेटचा पर्दाफाश होणार आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन या रॅकेटचा निःपक्षपाती चौकशी करून यामागील खरा मास्टरमाईंड शोधून काढेल का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# शेतकऱ्यांनो, उत्पादनवाढीसाठी तंत्रज्ञान वापरा

## पालकमंत्री विखे पाटील; सन २०२५-२६ खरीप हंगामपूर्व आढावा बैठक



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शेती अधिक शास्त्रशुद्ध, फायदेशीर व पर्यावरणपूरक बनावी, यासाठी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती पद्धतीत बदल करून कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. शेतीसाठी उपयुक्त माहिती शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सन २०२५-२६ खरीप हंगामपूर्व आढावा व नियोजन बैठकीत पालकमंत्री विखे पाटील बोलत होते. बैठकीस आ. अमोल खताळ, आ. विठ्ठलराव लंघे, आ. काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, शिर्डीचे अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, कृषी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सातत्याने मार्गदर्शन दिले जात आहे. हवामानातील बदल, जमिनीची गुणवत्ता, योग्य पीक निवड, सिंचन पद्धती, खतांचे प्रमाण या बाबींची माहिती

पान ४

> शेतकऱ्यांच्या पीक पद्धतीत झालेल्या बदलांचे सांख्यिकीय परीक्षण करावे. पीक विमा पद्धतीतील बदलांची सर्वदूर माहिती व्हावी, यासाठी व्यापक जनजागृती करावी. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये शेतीत होत असलेल्या नवनवीन प्रयोगांची माहिती शेतकऱ्यांना मिळावी. यासाठी कृषी पर्यटन योजना सुरू करण्यासाठी कृषीमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल. शेती उत्पादनाबरोबरच माल निर्यातीमध्ये जिल्हा अग्रेसर राहावा यासाठी पायाभूत सुविधा निर्माणावर भर द्यावा.
>
> **- राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

# तोतया पोलीस अधिकारी गजाआड

## ...अखेर श्रीरामपुरचा जग्गू इरानी पोलिसांनी पकडलाच

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपुर** : शिर्डी भारत-पाकिस्तान युद्ध सुरू असल्याचं सांगत वयोवृद्ध नागरिकांची तपासणी करत, त्यांना लुबाडणाऱ्या एका सराईत भामट्याला शिर्डी पोलिसांनी अत्यंत शिताफीने अटक केली आहे. आरोपी जाकीर हुसेन युसूफ खान उर्फ 'जग्गू इरानी' (वय ३०, रा. श्रीरामपूर) याच्यावर विविध राज्यांमध्ये वीसपेक्षा अधिक गुन्हे दाखल असून तो पोलिसांना अनेक दिवसापासून हवा होता, अशी माहिती डीवायएसपी शिरीष वमने यांनी दिली.



शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, आरोपी सध्या शहरात सक्रिय असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला. त्यानुसार, जग्गू इरानी एका वयोवृद्धाला 'युद्ध सुरू आहे, तपासणी करावी लागेल' असं सांगून त्यांची अंगठी आणि रोकड घेण्याचा प्रयत्न करत होता, याच वेळी पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडले.

अटक कारवाई दरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून नंबर नसलेली नवी कोरी पल्सर दुचाकी देखील जप्त केली आहे. या दुचाकीच्या वापरातून

पान ४

### पोलिस अधिकारी असल्याचा बनाव

पोलिस तपासात उघड झालं की, जाकीर हुसेन हा अनेक वेळा स्वतःला पोलीस अधिकारी, सीबीआय अधिकारी असल्याचं सांगून सामान्य नागरिकांना फसवायचा. त्याच्याकडे बनावट पोलीस ओळखपत्र सापडलं असून तो अत्यंत हुशारीने वयोवृद्ध, एकटे दुकट्या नागरिकांना लक्ष्य करत होता.

# पारदर्शक बदल्यांना ग्रहण तर लागणार नाही ना?

## जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा सवाल : प्रशासनाच्या भूमिकेकडे लागले लक्ष

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर : जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील कर्मचाऱ्यांची बदल्यांची प्रक्रिया राबविली जात आहे. पारदर्शक पध्दतीने ही प्रक्रिया राबवली जात असली तरी बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना तत्काळ कार्यमुक्त केले जाईल का? असा सवाल आता कर्मचाऱ्यांमधून केला जात आहे. मागील अनुभव पाहता काही कर्मचाऱ्यांना मुख्यालयातून कार्यमुक्ती लवकर मिळणार नसल्याची चर्चा सध्या जिल्हा परिषदेत सुरु आहे.**



जिल्हा परिषदेत सर्वच विभागातील बदली पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सध्या प्रशासन राबवित आहे. ही प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने राबवली जात असून कोणावरही अन्याय केला जात नसल्याचे दिसून येत आहे. परंतु, प्रशासनाच्या भूमिकेचा काही कर्मचाऱ्यांनी गैरफायदा घेण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. बदली झाल्यानंतर पुन्हा त्याच जागेवर राहण्यासाठी आता आपल्या विभागातील खाते प्रमुखांचा आधार घेण्यास सुरवात केलेली आहे. तर काहींनी सामान्य विभागातील काहींशी संपर्क साधून आपल्याला आहे, त्याच जागेवर कसे राहता येईल, या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.

सेवावर्ग करून घेण्यासाठी काहीजण आता प्रयत्न करणार असल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या वर्तुळात सुरु आहे. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह त्यांचे खास माणसे शोधून त्यांची मनधरणी करून सेवावर्ग करून घेण्यासाठी काहींनी प्रयत्न सुरु केलेले आहेत. या प्रयत्नांना किती यश मिळते, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे. प्रशासनाने बदली झालेल्यांना सेवा वर्ग करून त्यांची मुख्यालयात पुन्हा वर्णी लावू नये, अशी मागणी जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांमधून होत आहे.

### मागील बदली झालेले पुन्हा मुख्यालयातच राहिले

मागील दोन वर्षात काहींच्या बदल्या झालेल्या आहेत. त्यातील काहीजण बदली झाल्यापासून नियुक्तीच्या ठिकाणीच हजर होऊन परत तेथे गेलेले नसल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये सुरु आहे. तेच आता पुन्हा बदलीस पात्र झालेले असून ते पुन्हा बदलीच्या ठिकाणी हजर होतील का अशी चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये सुरु आहे.

### बदलीत आठवले अनेकांना वृध्द आईवडील

बदल्यांची प्रक्रिया सुरु झालेली आहे. या बदल्यांच्या प्रक्रियेत अनेकांना आता बाहेर जावे लागणार आहे. त्यामुळे काहींना आता आपल्या वृध्द आई-वडिलांची आठवण झालेली असून ती कारणे प्रशासनासमोर सादर केली जाऊ लागल्याची चर्चा सध्या कर्मचाऱ्यांमध्ये सुरु आहे.

# लग्नाच्या सात दिवस आधीच डॉक्टरचा अपघातात मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**



**जामखेड** : जामखेड तालुक्यातील नाहूली येथील एका तरुण पशुवैद्यकीय डॉक्टरचे सात दिवसांवर लग्न आले असतानाच त्याचा जामखेड-खर्डा रोडवर ट्रॅक्टर व दुचाकीच्या आपघातात मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

घरात लग्नाची धामधूम सुरु होती. पाहुणे मंडळींना पत्रिका वाटप सुरु होते. दि. २३ मे रोजी म्हणजे सात दिवसांवर लग्न आल्याने घरात लग्नाची तयारी आणि आनंदाचे वातावरण होते. तेवढ्यात काळाने आपला घाला घातला, याबाबत अधिक माहिती अशी की, मयत पशुवैद्यकीय डॉ. प्रल्हाद जाधव (वय २४, रा. नाहुली) हा काल दि. १६ रोजी सकाळी जामखेडवरून जनावरांची औषधे घेऊन आपल्या नाहुली गावी चालला होता. या दरम्यान खर्डा रोडवरील एका पेट्रोल पंपाजवळ वीट वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला ओव्हरटेक करताना आपघात होऊन पशुवैद्यकीय डॉक्टर तरुण

पान ४

# लांडे वस्तीवर दुचाकी जळून खाक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** गंगापूर तालुक्यातील माहुली येथील लांडे वस्ती येथे १५ मे रोजी सकाळच्या सुमारास एक दुचाकी गाडी पूर्णपणे जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आप्पासाहेब प्रकाश लांडे यांनी अलिकडेच टीव्हीएस कंपनीची चक २० इद ६७९५ क्रमांकाची दुचाकी खरेदी केली होती. ही गाडी नेहमीप्रमाणे त्यांनी बाळू शिंगाडे यांच्या शेताशेजारी असलेल्या चारीवती रात्री उभी केली होती. सकाळी कामावर जाण्यासाठी बाहेर पडताच त्यांना ती गाडी पूर्णपणे आगीच्या निस्ताभूत अवस्थेत दिसून आली.

दुचाकीच्या ठिकाणी जळालेली राख, विघटित अवयव व फोटोमध्ये दिसणारी पूर्णतः खाक झालेली स्थिती पाहता आगीचा तीव्रतेचा अंदाज येतो. या घटनेची माहिती मिळताच परिसरात भीती पसरली असून उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत. काहींनी ही घातपाताची शक्यता वर्तवली आहे. आग लागण्याचे नेमके कारण शोधले जात आहे.



▶ गाडीला अचानकपणे आग लागणं ही सामान्य गोष्ट नाही. यामागे काहीतरी कारण असावं. सध्या सर्वजण चिंतेत आहेत. रात्रीच्या वेळेस वस्तीवर सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**– शंकर लांडे, शेतकरी**

# घरकुल कॉलनी आदर्श करण्यासाठी प्रयत्नशील

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटीलसह ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची ग्वाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील दत्तनगर व बेलापूर येथील नियोजित घरकुल कॉलनी राज्यात आदर्श ठरतील यासाठी शासनस्तरावर सर्वतोपरी सहकार्य करु तसेच सदरच्या कॉलनी पथदर्शक ठरतील यासाठी प्रयत्न करु, असे आश्वासन राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिल्याची माहिती बाजार समितीचे माजी सभापती नाना शिंदे व उपसभापती अभिषेक खंडागळे यांनी दिली.

यासंदर्भात माहिती देताना शिंदे व खंडागळे यांनी सांगीतले की, दत्तनगर व बेलापूर येथील नियोजित घरकुल कॉलनी पालकमंत्री विखे पाटील यांच्या सहकार्याने मंजुर आहे. या कॉलनींसाठी ना. विखे यांनी दत्तनगर येथील १५ एकर जमिन घरकुलांसाठी दिली आहे. तर बेलापूर येथील ३४ एकर शेती महामंडळाची घरकुलांसह घनकचरा प्रकल्प व अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी जागा विनामुल्य उपलब्ध करुन दिली आहे. या जागेवर नियोजित घरकुल कॉलनी साकारणार आहेत.

सदरच्या कॉलनीमध्ये सौर उर्जा, पक्के रस्ते, पथदिवे, सांडपाण्यासाठी गटारी अशा विविध नागरी सुविधांबाबत ना. विखे पाटील यांच्या पुढाकाराने ना. गोरे यांच्याशी त्यांचे मंत्रालयातील दालनात बैठक घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली.



या चर्चेदरम्यान नानासाहेब शिंदे यांनी सांगितले की, दत्तनगर ग्रामपंचायतीला मिळालेल्या जागे मध्ये एकूण १११ घरकुलांचे बांधकाम करण्यात येणार आहे. तेथे 'माय वन' पद्धतीने बांधकाम करण्यात येणार असून सामान्य माणसाचे घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. घरकुल कॉलोनीतील प्रत्येक घराला सोलर सिस्टिम उपलब्ध करून दिल्यास त्याचा घरकुल धारकाला मोठा फायदा होणार आहे. या कॉलनीचे राधाकृष्णनगर व सुजयनगर असे नामकरण करण्यात आलेले आहे.

▶ कॉलनीसाठी ग्रामविकास विभागाकडून सोलर सिस्टिमचे टेंडर काढण्यात यावे जेणेकरून दर्जेदार व कमी किमतीमध्ये सोलर सिस्टिम घरकुल धारकांना उपलब्ध होतील, अशी सूचना ना. विखे पाटील यांनी मांडली. तसेच या नियोजित वसाहतीत नागरी सुविधा उभारण्यसाठी आणि सदर घरकुल वसाहती पथदर्शक ठरतील यासाठी शासनस्तरावर सर्वतोपरी सहकार्य करु, असे आश्वासन दिले.

▶ सदरच्या चर्चेनंतर पालकमंत्री विखे पाटील यांच्या सुचनेनुसार पालघर येथील जिल्हा परिषदेला भेट दिली. या भेटीदरम्यान सदरच्या जिल्हा परिषद राबवित आसलेल्या विविध लोकोपयोगी व ग्रामविकास उपक्रमांची माहिती घेतल्याचे शिंदे व खंडागळे यांनी सांगीतले.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त रक्तदान

## शंभुराजे सामाजिक प्रतिष्ठान व शहीद जवान स्मारक समितीवतीने ७० व्यक्तींनी केले रक्तदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे ३६८ व्या जयंतीनिमित्ताने शंभुराजे सामाजिक प्रतिष्ठान व शहीद जवान स्मारक समितीने श्रीगोंदा येथे सिंदुर रक्तदान शिबीरात ७० जणांनी रक्तदान केले व श्री छत्रपती संभाजी महाराज, सिंदुर ऑप्रेशन मधील शहीद जवान पहलगाम भ्याड हल्ल्यातील ठार झालेल्या नागरिकांना मानवंदना दिली.

रक्तदान शिबीर व वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन माजी नगराध्यक्षा शुभांगी पोटे व सतिश बोरा यांच्या हस्ते करण्यात आले. अग्नीपंख फौंडेशनने मदन बिसुकर्मा या नेपाळी रखवालदारास औषधोपचारासाठी दहा हजाराची मदत केली. श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवनावर २० बाल व्याख्यात्यांनी चित्त थरारक विचारशब्द वर्षाव करुन वक्तृत्व स्पर्धा गाजविली या स्पर्धेत प्रथम क्रमांक अंजली आढाव, द्वितीय क्रमांक देवेंद्र ओव्हळ, तृतीय क्रमांक उत्कर्ष थोरात यांनी पटकावला.




बक्षिस वितरण परिक्रमाच्या अध्यक्षा प्रतिभा पाचपुते, सनराईजच्या प्राचार्य राजेश्री शिंदे, जिल्हा सैनिक संघटनेचे संदीप सांगळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षक म्हणून दत्ता जगताप, प्रकाश चव्हाण, विठ्ठल बरबडे यांनी काम पाहिले.

यावेळी डॉ. विक्रम भोसले, अजीत काकडे, एम. डी. शिंदे, सुधीर खेडकर, सतिश मखरे, शहाजी खेतमाळीस, बाळासाहेब खामकर, राहुल कोठारे, अभिषेक दंडनाईक, अमोल दंडनाईक, अॅड संपत विधाते, किसन वऱ्हाडे, विजया लंके, रेश्मा दरेकर, चंद्रकात कोंथिबीरे, रेश्मा डांगे, आयुब तांबोळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नवनाथ खामकर, नवनाथ दरेकर, संतोष जाधव, विकी शिवले, गोपाळराव डांगे परिश्रम घेतले.

▶ शिवशंभु सामाजिक प्रतिष्ठानने श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे जयंती निमित्ताने सिंदुर रक्तदान व वक्तृत्व स्पर्धेचा चांगला उपक्रम राबविला आहे.

**– प्रतिभा पाचपुते**

▶ श्रीगोंद्यात सामाजिक जाणिवेतून वेगवेगळे उपक्रम राबविले जातात आहेत हे कौतुकास्पद आहे.

**– शुभांगी पोटे**

# श्रीपत बळीद यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी शहरातील तनपुरवाडी येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त ग्रामविकास प्रतिष्ठान व भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने येथील बौद्ध विहारात श्रामणेर भिक्खू संघाच्या उपस्थितीत त्रिशरण पंचशील व धम्मप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वातंत्र्य सैनिक मोहनराव गाडे जीवन गौरव पुरस्कार प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते श्रीपत बळीद यांना प्रदान करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक सुंदरमामा कांबळे होते. यावेळी बौद्धाचार्य हिरामण थोरात, सुरज क्षेत्रे, विजय हुसळे, पप्पु बोर्डे, लौकीक कांबळे, निसर्गध गुरुजी, एकनाय ठोकळ, रामदास सोनवणे, अरुण थोरात, प्रा. डोळस, साळवे, उपासिका मंदाकिनी गाडे व मिना शिंदे यांची उपस्थिती होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य रतिलाल क्षेत्रे यांनी धम्मदेसना देत सर्वांसाठी मंगलकामना व्यक्त केली. विजय हुसळे यांनी प्रभावी धम्मप्रबोधन सादर केले. यावेळी पप्पु बोर्डे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक महेंद्र राजगुरु तर सूत्रसंचालन दिलीप सरसे यांनी केले. तर आभार जगदीश गाडे यांनी मानले.

# फिजिओथेरपी, कायरोप्रॅक्टीक, ऑस्टिओपॅथी मोफत शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहमदनगर रिहॅब सेंटर व रिक्युअर क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक १९ मे २०२५ रोजी सावेडी, नोबल हॉस्पिटल शेजारी प्रेमदान चौकातील अहमदनगर रिहॅब सेंटर मध्ये फिजिओथेरपी, कायरोप्रॅक्टीक, ऑस्टिओपॅथी मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरामध्ये पाठ दुखी ,मान दुखी, मनक्याचे आजार गुडघ्याचे आजार ,वेदना व्यवस्थापन आणि पुनर्वसन यावर मोफत मार्गदर्शन करून उपचारावर ५०% सूट दिली जाणार आहे. अशी माहिती अहमदनगर रिहॅब सेंटरचे डॉ. किशन गोपाल राजपूत यांनी दिली. अधिक माहितीसाठी ९१ ७६६६२९२०९७/ +९१ २४१ ३५८ ७७४६ या क्रमांकावर संपर्क साधून शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान डॉ. गोपाल यांनी केले.

# २५ वर्षानंतर मिळाला जुन्या आठवणींचा उजाळा

## शिऊर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील शिऊर गावातील जिल्हा परिषद शाळेतील १९९९ मधील इयत्ता दहावी मधील विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा पार पडला.

तब्बल २५ वर्षानंतर वर्गातील मित्र मैत्रिणी व शिक्षक एकमेकांना भेटले. प्रत्येकाने आपापले सुख दुःखाचे प्रसंग सांगितले. शाळेमध्ये असताना जुन्या आठवणींचा उजाळा केला.

सकाळी शाळेमध्ये शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



यावेळी शिंदे, सय्यद, भावसार, गवळी, आहेर व जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच विद्यार्थ्यांपैकी भारत दांडगे, देवनाथ कदम,मुबिन सय्यद, संदीप देशमुख, रोहिणी चुडीवाल, भागीत्रा जाधव, गणेश जाधव, पल्लवी भावसार, वर्षा अन्नदाते, मंगल सोनवणे, रामेश्वर जाधव, बाबासाहेब काळे, रूपाली लोढा, अण्णा पगारे, राजू आघाडे, भाऊसाहेब पगारे, प्रवीण पगारे, संतोष जाधव, केशव जानोसे, तुकाराम वाळके, सुनील जाधव, योगेश्वर गवळी, दादासाहेब जाधव, माया सोनवणे, सुवर्णा डोंगरे, विष्णू निळ, सुरेश ढोबळे, प्रिया कायस्थ, मीरा सूर्यवंशी, शोभा जाधव, मुमताज शेख,कृष्णा सामृत यांसह आदींची उपस्थिती होती.

या बॅचमधील सर्व विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी म्हणजे जुनी संस्कृती व विज्ञान युग यांना जोडणारा एक दुवा आहे. शेवटी पुरणपोळीचा गोड आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# मातोश्री उर्दू हायस्कूलचा दहावीचा ९८ टक्के निकाल



खान बुशरा फिरोज शेख हुमेरा एजाज सय्यद सफीना रियाज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** अहमदनगर येथील अलफलाह एज्युकेशन अॅण्ड वेलफेअर सोसायटी संचलित मातोश्री उर्दू हायस्कूल आलमगीर नागरदेवळे या विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. एसएससी परीक्षा मार्च-२०२५ च्या परीक्षेत विद्यालयाने ९८ टक्के निकाल प्राप्त केला आहे. एसएससी परीक्षेस विद्यालयातून ४३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. शाळेतील विद्यार्थिनी खान बुशरा फिरोज हिने ८६.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर शेख हुमेरा एजाज हिने ७६ टक्के, सय्यद सफिना रियाज हिने ७५.२० टक्के गुण प्राप्त करून तिसरा क्रमांक प्राप्त केला.

# 'अमृतवाहिनी'च्या ११७ विद्यार्थ्यांना कंपनीत नोकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** गुणवत्ता पूर्ण शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या नोकरीसाठी विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी असलेल्या समन्वय करारामुळे अमृतवाहिनी आयटीआयमधील ११७ विद्यार्थ्यांची अमेरिका स्थित असलेल्या स्टेनले ब्लॅक अँड डेकर लिमिटेड पुणे डिव्हिजन मध्ये मोठ्या पॅकेजवर निवड झाली असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे व प्राचार्य विलास भाटे यांनी दिली आहे.

प्राचार्य म्हणाले की, माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे आणि संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी आयटीआयने सातत्याने गुणवत्ता पूर्ण शिक्षणाला प्राधान्य दिले आहे.

संस्थेमध्ये नोकरी करता स्वतंत्र ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग कार्यरत असून या विभागाच्या वतीने विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांची समन्वय करार करण्यात आला आहे. यापूर्वीही टेल्को बजाज या कंपनीमध्ये अनेक विद्यार्थ्यांची मोठ्या पगारावर यावर्षी निवड झाली आहे.

त्याचप्रमाणे अमेरिकन स्थित असलेल्या स्टेनले ब्लॅक अँड डेकर चाकण डिव्हिजन करता फिटर मेकॅनिक मोटर व्हेईकल मेकॅनिक डिझेल इलेक्ट्रिशियन वायरमन कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेडच्या मुलाखती घेण्यात आल्या यापैकी ११७ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

ही कंपनी १८० देशांमध्ये कार्यरत असून ८५० शाखा आहेत २२ मिलियन डॉलरचा टर्नओव्हर असल्याने विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठी संधी आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत निसर्गरम्य सुंदर परिसर, अत्याधुनिक सुविधा आणि प्लेसमेंट साठी परिपूर्ण प्रयत्न असल्याने संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांना मोठ्या पगारावर थेट नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत.

### विद्यार्थ्यांवर मान्यवरांकडून कौतुकांचा वर्षाव

▶ सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, विश्वस्त मा. आ. डॉ. सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्रा. व्ही. बी. धुमाळ, अॅकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य विलास भाटे आदींनी अभिनंदन केले आहे.

# माय भारतचा पुढाकार: तरुणांसाठी नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून संधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या माय भारत या उपक्रमाने देशभरातील युवकांना नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यासाठी आवाहन केले आहे. या अभियानाचा उद्देश देशातील तरुणांना राष्ट्रीय आपत्ती, संकट आणि अपात्कालीन परिस्थितीत प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी सज्ज करणे हा असल्याची माहिती नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष यांनी दिली.

या उपक्रमांतर्गत नैसर्गिक आपत्ती, अपघात, सार्वजनिक संकट आणि इतर अनपेक्षित घटनांच्या वेळी नागरी प्रशासनास पूरक ठरू शकेल अशी सुप्रशिक्षित आणि सज्ज स्वयंसेवकांची टीम तयार केली जाणार आहे. यामध्ये बचाव कार्य, निर्वासन, प्रथमोपचार सेवा, आपत्कालीन काळजी, वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन, सार्वजनिक सुरक्षितता, आपत्ती प्रतिसाद आणि पुनर्वसन कार्य यांचा समावेश आहे.

माय भारत या उपक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे यात सहभागी होणाऱ्या तरुणांना वास्तविक परिस्थितीत काम करण्याचे प्रशिक्षण दिले जाईल. तसेच त्यांच्यात नागरिक जबाबदारी, शिस्त आणि देशसेवेची भावना वाढीस लागेल. या उपक्रमात सहभागी होणारे युवक हे केवळ स्वयंसेवक म्हणून कार्य करत नाहीत, तर ते आपत्कालीन काळात जीवन वाचवणाऱ्या महत्त्वाच्या यंत्रणेचा भाग ठरणार आहे.या अभियानात सर्व उत्साही युवकांनी सहभागी होण्यासाठी नेहरू युवा केंद्राच्या वतीने खुले आवाहन करण्यात आले आहे. नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष यांनी सांगितले की, सध्या निर्माण झालेल्या सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या गरजांमुळे सज्ज नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या माध्यमातून तरुणांनी नेतृत्व घेऊन समाजात सकारात्मक परिवर्तन घडवावे, या मोहिमेचा मुख्य उद्देश त्यांनी सांगितला.

# शहरात बरसल्या पावसाच्या सरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शुक्रवारी दुपारी अचानक पावसाच्या सरी कोसळल्याने शहरातील वाहतुक व्यवस्था कोलमडली असल्याचे चित्र पाहिला मिळाले. शहरतील रस्त्यावर पाणीच पाणी व रस्त्याचे काम सुरु असलेल्या ठिकाणी चिखल पाहिला मिळाला.

# महिलांनो, आरोग्य, आत्मनिर्भरतासह कौशल्यविकासावर भर द्या

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे; कर्जतमध्ये दुर्गाशक्ती महिला सन्मान समारंभ उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** महिलांना आरोग्य, स्वाभिमान, आत्मनिर्भरता आणि कौशल्यविकास यावर भर देणे गरजेचे आहे. आपण स्वतः चांगले दिसण्यासाठी दुसरा वाईट दिसला पाहिजे, याची आवश्यकता नाही. आपण निरोगी, सशक्त आणि आत्मविश्वासपूर्ण असले पाहिजे, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

अहिल्यानगर येथील कर्जत तालुक्यात शिवसेना महिला आघाडीच्या वतीने दुर्गाशक्ती महिला सन्मान समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी नगराध्यक्ष रोहिणी घुले यांच्यासह शिवसेनेच्या महिला आघाडीच्या पदाधिकारी उपस्थित होत्या.

डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, महिलांसाठी सुरु केलेल्या योजनांचा उल्लेख करताना त्यांनी 'लाडकी बहीण' योजनेतून मिळणाऱ्या दीड हजार रुपयांच्या निधीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची माहिती दिली. घरकाम करणाऱ्या महिलांची नोंदणी करून त्यांना लाभ देण्यासाठी महसूल विभागाच्या मदतीने शिबिरे आयोजित करण्याची तयारी दर्शवली. ज्यांच्याकडे आधार कार्ड नाही, अशा महिलांना घरमालकाकडून प्रमाणपत्र मिळवून देण्याच्या प्रक्रियेबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.




महिलांच्या आरोग्यासाठी मोफत रक्त तपासणी व कॅल्शियम तपासणीचे शिबिर २५ मेनंतर स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रांवर राबवले जाणार असून, प्रत्येक महिला कार्यकर्तीने आपल्या विभागातील महिलांची नोंदणी करावी, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सुचवले. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या सरकारी दाखल्यांसाठी महसूल शिबिराचे आयोजन करून त्यातून मोफत सेवा देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्रशिक्षण, योजनांची माहिती, आरोग्य व आर्थिक स्वावलंबन या बाबींवर भर द्यावे असे त्यानी सांगितले. या कार्यक्रमास डॉ. शबनम इनामदार, उज्वला भोपळे, मीरा शिंदे, सविता जंजिरे पाटील, सुनिता मोरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

▶ घर उद्योग व बचत गटांच्या महिलांसाठी मुंबई, ठाणे येथे त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही योजना आखली जाणार आहे. हे उत्पादन कसे पोहोचवायचे, कोणत्या प्रकारचे व्यवसाय निवडायचे, यावर प्रशिक्षण देण्यासाठी सरकारतर्फे मदत मिळेल.

**– डॉ. नीलम गोऱ्हे, उपसभापती**

# कर्जतमध्ये कडकडीत बंद, रस्ता रोको आंदोलन

## आता हा मोदी आणि देवा भाऊंचा देशः आ. पडळकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** आता हा देश पूर्वीचा राहिलेला नाही. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा देश आता झाला आहे. ही बाब जीहादींनी लक्षात घ्यावी. त्यांच्या लक्षात येत नसेल तर त्यांनी पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याचे व्हिडिओ पुन्हा एकदा पाहावेत, असा इशारा आमदार गोपीचंद पडळकर यांनी कर्जत येथे बोलताना दिला आहे.

कर्जत येथील पुरातन अशा हनुमान मंदिर व मल्लिकार्जुन मंदिर या परिसरामध्ये अतिक्रमण करण्यात आलेले आहेत. हे अतिक्रमण काढावी, या मागणीसाठी अखंड हिंदू समाज यांच्या वतीने काल कर्जत शहर बंद ठेवून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर व आमदार संग्राम जगताप यांच्यासह अखंड हिंदू समाज या संघटनेचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने हे उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, हा देश आता तिरंग्याला मानून भगव्याची पूजा करणार आहे. आमच्या मंदिर परिसराचे पावित्र्य राखले गेले पाहिजे. कर्जत येथील हनुमान मंदिर व इतर मंदिरा परिसरामध्ये इतर धर्मियांनी केलेले अतिक्रमण हे काढून टाकले जाईल. हा प्रश्न फक्त कर्जाचा नसून अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी अशा पद्धतीच्या घटना घडल्या आहेत. त्या- या पुढील काळामध्ये सहन केल्या जाणार नाहीत.

आ. पडळकर म्हणाले की, आज कुणी धर्मांध, जिहादी, हिंदूंवर आक्रमण करण्याच्या भूमिकेमध्ये असेल तर त्यांनी सांगा पुन्हा एकदा पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्याची व्हिडिओ बघ हा पूर्वीचा भारत आता राहिलेला नाही. तुमच्याशी चर्चा करू



आणि मार्ग काढू, शांतता राखू बोलणी करू यापुढे आता असे होणार नाही. यामुळे प्रशासनाने देखील याची गंभीर दखल घ्यावी. कर्जत नगरपंचायतचे मुख्याधिकारी, प्रांत, तहसीलदार यांनी ही बाब आता गांभीर्याने घ्यावी. ज्या गट नंबर मध्ये न्यायालयाची स्थगिती नाही उर्वरित सर्वाधिक्रमण काढून टाका. ज्या गटाच्या बोगस नोंदी केलेल्या आहेत, त्या देखील तात्काळ रद्द करा.

अतिक्रमण काढण्याचे लेखी आदेश देणारे प्रांत अधिकारी यांची पत्र तहसीलदार गुरु बिराजदार यांनी आमदार संग्राम जगताप यांना दिले. यानंतर भर उन्हामध्ये जवळपास तीन तास सुरू असणारे आंदोलन स्थगित करण्यात आले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कर्जत मध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# डॉ. तनपुरे कारखान्यात तिरंगी लढत

## निवडणुकीसाठी ५६ उमेदवार रिंगणात, ११६ जणांची माघार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**देवळाली प्रवरा :** राहुरी येथील डॉ.बाबुराव बापूजी तनपुरे साखर कारखाना निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी तब्बल ११६ उमेदवारांनी अर्ज माघे घेतले असून ५६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत. बाजार समिती सभापती अरुण तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली जनसेवा मंडळ, युवा नेते राजूभाऊ शेटे यांचे शेतकरी विकास मंडळ व कारखाना बचाव कृती समिती यांच्यात तिरंगी लढत कारखाना निवडणुकीत रंगणार आहे. मात्र या निवडणूकीत राहुरी कारखाना बचाव कृती समितीला उमेदवार न मिळाल्याने लंगडा पॅनल घेवून निवडणूकीत उतरले आहे. तर आ. शिवाजीराव कर्डीले व माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या परिवर्तन पॅनलने निवडणूकीतून माघार घेतली आहे.

डॉ. तनपुरे कारखाना निवडणुकीसाठी जवळपास १७३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. गुरुवारी सत्यजित कदम यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यानंतर आज आ. शिवाजी कर्डिले, माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम तथा भाजपच्या सर्वच उमेदवारांनी आपले अर्ज काढून घेतले. त्यामुळे या निवडणुकीत तिरंगी लढतीचे चित्र स्पष्ट झाले. कृती समितीला काही गटात उमेदवार नसल्याने पॅनल लंगडा झाला आहे.

# आशा सेविकांचा तहसील कार्यालयावर मोर्चा !



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव मध्ये आज गुरुवार दि १५ रोजी अशा कर्मचारी व गटप्रवर्तक कर्मचारी यांचा आपल्या विविध मागण्यांसाठी शेवगाव तहसील कार्यालयावर भव्य असा मोर्चा काढण्यात आला होता.

अशा कर्मचारी व गटप्रवर्तक कर्मचारी यांना राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांनंतर कोणत्याही प्रकारचे मानधन अद्याप पर्यंत शासनाकडून दिले गेले नाही. तसेच आपल्या वरिष्ठांकडून काम करताना अन्याय होत असल्याची तक्रारी त्यांनी यावेळी केली. यावेळी महिला कर्मचाऱ्यांनी सरकारच्या विरोधात मोठी घोषणाबाजी केली. हा मोर्चा कॉम्रेड संजय नांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आला होता. यावेळी मोठ्या प्रमाणावर गट प्रवर्तक व आशा कर्मचारी या मोर्चात सहभागी झाल्या होत्या.

यावेळी अंजली भुजबळ, सुवर्णा देशमुख, फरान पठाण, सविता चव्हाण, शितल थोरवे, अनिता इंगळे, मंगल कोल्हे, मिना बोरूडे, शोभा घुले, अस्मिता माळीसह महिला कर्मचारी हजर होत्या.

# पहिल्याच पावसात नेवासा बाजारपेठ जलमय

## खो-खो प्रशासनामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासे :** अवघ्या एका तासाच्या जोरदार पावसाने नेवासा शहरातील बाजारपेठ जलमय झाली. ड्रेनेज होल बंद, गटारी तुंबलेली आणि निचऱ्याची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे बाजारपेठ व परिसरात पाणीच पाणी साचले. नागरिक आणि व्यापाऱ्यांचे प्रचंड हाल झाले असून, नगरपंचायतीच्या ढिसाळ नियोजनावर सवाल उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे, मागील वर्षीच नगरपंचायतीला मान्सूनपूर्व कामांसंदर्भात पत्र देण्यात आले होते, मात्र त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे गटारींचे पाणी रस्त्यावर आले, मॅनहोल बंद असल्यामुळे निचरा होऊ शकला नाही आणि परिसरात दुर्गंधीचा त्रास निर्माण झाला. बाजारपेठ व नगरपंचायत कार्यालय परिसरात मॅनहोल उघडा ठेवला की, प्रचंड दुर्गंधी निर्माण होते, त्यामुळे तो कायम बंद ठेवण्यात येतो. यामुळे पाणी रस्त्यावरच साचून राहते. नेवासा शहरात तयार केलेले बंद गटारी या तांत्रिकदृष्ट्या चुकीच्या आणि ठेकेदारांच्या भ्रष्टाचारामुळे निकृष्ट आणि पाण्याचा उतार न पाहता केलेल्या आहेत.

या परिस्थितीचे मुळ कारण म्हणजे नेवासा नगरपंचायतीतील प्रशासकीय अस्थिरता. मागील एक वर्षात सहा प्रभारी अधिकारी बदलले गेले असून, यामुळे नगरपंचायतीचे कामकाज पूर्णतः विस्कळीत झाले आहे. नागरिक आणि व्यापाऱ्यांनी या सर्व गोंधळाचा तीव्र निषेध करत, नेवासा नगरपंचायतीसाठी स्थायिक व पूर्णवेळ कार्यकारी अधिकाऱ्याची तातडीने नेमणूक करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा शहरातील प्रशासन कोलमडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रभारी अधिकाऱ्यांची साखळी थांबेना

अंबादास गुरसळ गेल्यानंतर काही काळ सोनाली म्हात्रे या प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी सुमारे तीन-चार महिने जबाबदारी सांभाळली. त्यानंतर प्रभारी अधिकाऱ्यांची मालिकाच सुरू झाली. राहुरीचे ज्ञानेश्वर ठोंबरे यांनी एक महिना काम पाहिले, त्यानंतर श्रीरामपूरचे सोमनाथ जाधव यांनीही एक महिनाच जबाबदारी सांभाळली. शेवगावच्या विजया घाडगे यांनी केवळ पंधरा दिवस काम पाहिले, तर देवळालीचे विकास नवाळे हे फक्त आठवडाभरच राहिले. सध्या पाथर्डीचे संतोष लांडगे कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त आहेत.



# उपलब्ध पाण्याचा उपयोग काटकसरीने करा

## शालिनीताई विखे; लोणी, आडगांव येथील पाझर तलावांचे जलपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** निळवंडेचे आवर्तन उन्हाळ्यामध्ये देऊन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्वांनाच मोठा दिलासा दिला आहे. उपलब्ध पाण्याचे काटेकोरपणे नियोजन करून ऊस लागवडीला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील यांनी करतानाच निळवंडेचे पाणी शेवटच्या घटकाला देणे, हाच मंत्री विखे पाटील यांचा ध्यास असल्याचेही त्यांनी सांगितले.



निळवंडे लाभक्षेत्रातील लोणी खुर्द येथील मापरवाडी, गाडगे मळा, निमशेवाडी, आडगाव खुर्द, तलाव या ठिकाणी आयोजित जलपूजन प्रसंगी विखे पाटील बोलत होत्या. यावेळी विविध संस्थांचे पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी, महिला उपस्थित होत्या.

विखे पाटील म्हणाल्या की, जिरायत भागाला निळवंडेचे पाणी देऊ, हा शब्द दिला होता, तो आता पूर्ण झाला आहे. पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी जिल्हा परिषद उपाध्यक्ष असताना बांधलेल्या पाझर तलावात आज जल पूजन करताना मोठा आनंद होत असल्याचे सांगत उपलब्ध पाण्याचे नियोजन काटकसरीने करा, यावरती वेगवेगळ्या पिकांबरोबरच उसाचीही लागवड करा. ऊस उत्पादन वाढीसाठी नवीन तंत्रज्ञान अवगत करून आपले उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करावा.

पाणी आले म्हणून पिकांना भरपूर पाणी न देता काटकसरीने पाण्याचा वापर करा. अजूनही ज्या भागांमध्ये पाणी मिळाले नाही, त्या भागालाही पाणी देण्याचा प्रयत्न डॉ. विखे पाटील यांच्या माध्यमातून सुरू आहे. आवर्तन काळामध्ये अनेक पाझर तलाव भरल्याने याचा उपयोग या भागातील पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीच्या पाण्याचाही प्रश्न सुटणार सुटल्याने जनतेने मंत्री विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

# एटीएम कार्ड अदलाबदली करून लुटले


## शेतकऱ्याची २ लाख ३२ हजारांची लूट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील मोहोज देवढे येथील ८१ वर्षीय शेतकरी विक्रम सातोबा दहिफळे यांची तब्बल २ लाख ३२ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

ही फसवणूक शेतामधील कामासाठी ठेवण्यात आलेल्या अब्दुल खान उर्फ बाजी मेहेद्र खान (रा. चुक्कती, ता. मोघा, पंजाब) याने केली असून, पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकरी विक्रम दहिफळे हे आपल्या कुटुंबासोबत पाथर्डी येथे वास्तव्यास असून, त्यांच्या तीनही मुलांचा नोकरीनिमित्त पुणे येथे राहण्याचा उल्लेख त्यांनी दिलेल्या फिर्यादीत केला आहे. आरोपी अब्दुल खान हा सुमारे सहा महिन्यांपासून त्यांच्या शेतामध्ये काम करत होता. दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी दहिफळे यांनी त्यास एटीएममधून पैसे काढण्यासाठी सोबत नेले असता, आरोपीने चलाखीने महाराष्ट्र बँकेचे एटीएम कार्ड बदलून त्याच्या जवळील कॅनरा बँकेचे कार्ड त्यांच्या पाकिटात ठेवले.

या प्रकाराची शंका न आल्याने दहिफळे यांनी काही दिवसांनी पुन्हा पैसे काढण्यासाठी गेल्यावर त्यांना



आपले एटीएम कार्ड बदललेले आहे आणि खात्यातील पैसे काढले गेले आहेत, हे लक्षात आले. बँकेच्या चौकशीत २२ फेब्रुवारी ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान २,३२,००० रुपये काढले गेले असल्याचे स्पष्ट झाले.या प्रकारामुळे वृद्ध शेतकरी हतबल झाले असून, मुलांशी चर्चा करून त्यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# स्वस्त सोने देण्याचे अमिष दाखवून लुटणारे गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** स्वस्तात सोने देण्याचे अमिष दाखवून लुटणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले आहे. सोन्या शिवाजी काळे, अभित्या शिवाजी काळे, शुभम रामचंद्र पवार असे अटक केलेल्या आरोपींची नावे असून पसार आरोपींचा शोध सुरू आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गजाआडयातील फिर्यादी राजेंद्र दिलीप मैड (रा. आश्वी, ता. संगमनेर) यास महिला आरोपी नामे अश्विनी हिने फिर्यादीस १५० ग्रॅम सोने १० लाख रूपये असे स्वस्तात देण्याचे आमीष दाखवून कुसडगाव (ता. जामखेड) येथे बोलविले. फिर्यादी पैसे घेऊन आल्यानंतर महिला आरोपी अश्विनी व तिचे ८ ते १० साथीदारांनी फिर्यादीस मारहाण करून त्यांचेकडील १० लाख रूपये रोख रक्कम, सोन्याचे दागिने व मोबाईल असा मुद्देमाल जबरीने चोरून नेला. याबाबत जामखेड पोलीस गुन्हा दाखल आहे.

पथकाने ताब्यातील आरोपींना विश्वासात घेऊन गुन्हयाचे अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा हा विकास काज्या काळे, जरेणी विकास काळे, लालासाहेब काज्या काळे, किरण काज्या काळे, वनिता रामचंद्र पवार, दिक्षा रामचंद्र पवार, सुनिल शिवाजी काळे, रेश्मा सुनिल काळे अशांनी मिळून केला असल्याची माहिती सांगितली. ताब्यातील आरोपीस गुन्हयाचे तपासकामी जामखेड पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास जामखेड पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

# तोतया पोलिसाने वृध्दास लुटले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** आश्वी खुर्द (ता.संगमनेर) येथील गबाजी बाळाकृष्ण भोसले (वय ७३) यांना तोतया पोलीसाने फसवणूक करीत त्यांची १० ग्रॅम सोन्याची अंगठी घेऊन पसार झाला.

भोसले हे नित्यनियमाने घरातुन सायकलवर हानुमानवाडी दाढ खुर्द येथे लक्ष्मीआई मंदिरात चालले होते. त्यावेळी कोगजे वस्ती ते न्याय डेअरी दरम्यान डांबरी रस्त्यावर ३० ते ३५ वर्षे वयाचा अनओळखी युवकाने त्यांना थांबवत सांगितेल की, मी पोलिस खात्याचा चेंकींग करणारा आहे. सध्या तणावाची परिस्थिती चालू आहे. तुम्ही तोंडाला मास्क का नाही लावला. तुमच्या खिशात काय काय आहे.ते सगळे दाखवा असे सांगत हातीतील आंगठी काढण्यास सांगितली तसेच खिशातील पाकीट काढण्यास सांगितले. नंतर त्याने पाकीट व अंगठी त्यांच्या पिशवीत टाकली. सदर घटना त्यांनी आपल्या घरच्यांना सांगितली.

# श्रीरामपुरातील 'अल्प्राझोल' पावडरीला नागपूरचा गंध?

## एमआयडीसीतील गोडावूनमधून माल निघाल्याची नागरिकांमध्ये चर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहर पोलिसांनी पकडलेल्या १३ कोटी ७५ लाख ४१ हजार रुपयांचा अल्प्राझोलमच्या पावडरला नागपूरचा गंध असल्याची चर्चा शहरामध्ये झडत आहे. आपले नाव या गुन्ह्यात येवू नये, यासाठी या मोहरक्याने पोलिसांना रग्गड मलिदा दिल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे पोलिस आता नेमकी काय कारवाई करतात, याकडे जनतेचे लक्ष लागून आहे. गुन्हा दाखल झालेले दोन्ही आरोपी हे केवळ प्यादा असल्याचे कळते. यांचा आका पोलिसांना सापडणार का? याबाबत नागरिकांमध्ये उत्सुक्ता आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर ही कारवाई करण्यात आली. एमआयडीसी परिसरात एक टाटा एस छोटा हत्ती टेम्पो (एमएच २० बीटी ०९५१) अंमली पदार्थांची वाहतूक करत आहे. माहितीची शहानिशा करून त्यांनी श्रीरामपूर शहर पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांना याबाबत आदेश दिले. देशमुख यांनी तत्काळ विशेष पथक तयार करून शोधमोहीम सुरू केली. दिघी-खंडाळा रोडवर एक क्रिम रंगाचा छोटा हत्ती टेम्पो संशयास्पदरीत्या फिरताना दिसला. पोलिसांनी टेम्पो थांबवून चौकशी केली. चालकाने आपले नाव मिनीनाथ विष्णू राशीनकर (वय ३८, रा. धनगरवाडी, ता. राहाता) असे सांगितले. गाडीत सापडलेल्या गोण्यांमध्ये स्फटिक हे अल्प्राझलेम औषधाचे असून पावडर त्याची कच्ची सामग्री असल्याचे राशीनकर याने सांगितले. खात्री करण्यासाठी अहिल्यानगर येथील फॉरेन्सिक तज्ज्ञांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. त्यात स्फटिक हे अल्प्राझोलम नावाच्या अंमली पदार्थाचे असून पावडर त्याच्या निर्मितीसाठी वापरली जाते, असे स्पष्ट झाले. राशीनकर यास हे अंमली पदार्थ त्याला विश्वनाथ कारभारी शिपणकर (रा. दौड, जि. पुणे) याने दिल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी दोघांविरोधात एनडीपीएस कायदांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपी मिनीनाथ राशीनकरला अटक केली असून, विश्वनाथ शिपणकर फरार आहे.

### १४ गोण्या पावडर, सात गोण्या स्फटिक

पंचासमक्ष गाडीची तपासणी केली असता पांढऱ्या रंगाच्या २१ गोण्या आढळल्या. यात १४ गोण्या पांढऱ्या पावडरने तर ७ गोण्या पांढऱ्या स्फटिकांनी भरलेल्या होत्या. अल्प्राझोलम क्रिस्टल्स ६९.७६७ किलोग्रॅम (अंदाजे बाजारमूल्य सहा कोटी ९७ लाख ६७हजार रुपये), कच्चा माल (पावडर) ३३८.३७ किलोग्रॅम (अंदाजे किंमत सहा कोटी ७६ लाख ७४ हजार रुपये), वाहतूक करणारा टेम्पो (एक लाख रुपये) असा एकूण १३ कोटी ७५ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### पावडरची विल्हेवाट श्रीरामपुरातून

पोलिसांना सापडलेली अल्प्राझोल पावडर रेल्वेद्वारे दुसऱ्या जिल्ह्यामध्ये पाठविली जात होती. यासाठी रेल्वेमधून खाद्य पदार्थ तसेच इतर पदार्थांची विक्री करणाऱ्यांचा वापर केला जात आहे. सदरची पावडरची खुलेआम विक्री इराणी मोहल्ला परीसरात होत आहे. अनेक तरूण या पावडरमध्ये पाणी ओतून इंजेक्शनद्वारे नसेतून घेतात. आजही या ठिकाणी इंजेक्शनचे ढिग पडल्याचे दिसून येतात.

# विजेच्या खांबाचा महिलेला बसला शॉक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव शहरात विद्युत वितरण विभागाचा अनागोंदी कारभार नागरिकांच्या जीवावर बेतत आहे. गुरुवारी दुपारी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने विजेच्या खांबावर स्पार्किंग होऊन सदर खाबांमध्ये विद्युत प्रवाह सुरु झाला. या खांबाजवळच शेंगदाणे, फुटाण्याची हातगाडी लावलेली होती. या हातगाडीमध्ये विजेचा प्रवाह उतरला. शेंगादाण्याची विक्री करणाऱ्या संगीता नानासाहेब साटोटे यांचा स्पर्श हातागाडीच्या चाकाला होताच सदर महिलेला दूर फेकले गेले. दैव बलवत्तर म्हणून सदरची महिला वाचली.

कोपरगाव शहरातील गुरुद्वारा रोडवरील वाणी कॉम्प्लेक्सच्या कॉर्नरला सचिन वॉच समोर असलेल्या इलेक्ट्रिकचा खांब जेथे शेंगदाणा फुटाण्याची गाडी लागते. त्या ठिकाणी विद्युत वाहक वायर सदर खांबाला गुंडाळून ठेवली होती. अचानक गुरुवारी दुपारच्या सुमारास पाऊस आल्यामुळे या खांबावर स्पार्किंग झाली व विद्युत वाहक तार सदर खांबाला चिटकली. शेजारीच फुटाणे विक्री करणाऱ्या महिलेच्या हातगाडीत करंट उतरल्याने तिला विजेचा धक्का बसला.

नुकतेच दोन दिवसापूर्वी लाईटच्या खांबाला चिटकून गाय आणि वासराचा अंत झाला होता. त्या बातमीची शाई पुसते नाही तोपर्यंत दुसरी घटना घडली असून महावितरणने कोपरगाव शहरातील अनेक उपनगरांमध्ये विजेचे खांब धोकादायक बनले आहेत.

# संपादकीय

## युध्द महत्वाच्या टप्प्यावर...

पाकिस्तानमधील कट्टर इस्लामवादाचा परिणाम म्हणूनच २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला करण्याची घटना घडली. २०१४ नंतर सत्तेत आलेल्या मोदी सरकारने हा पाकिस्तानी डाव ओळखला आणि आता अशा प्रकारच्या हल्ल्यांसाठी आपण पाकिस्तानलाच जबाबदार धरणार असल्याचे जाहीर केले. १९८० च्या दशकापासून पाकिस्तान अण्वस्त्रयुद्धाचा बागुलबुवा उभा करुन भारताकडून प्रत्युत्तरादाखल होणाऱ्या कारवाईला खीळ घालत आला आहे. कोणत्याही देशाच्या अण्वस्त्रसज्जतेत तीन मुद्दे महत्त्वाचे असतात. त्यात अणुबाँब आणि ते वाहून नेणारी क्षेपणास्त्रे वा विमाने असणे तसेच एखाद्या राष्ट्राची राजकीय इच्छाशक्ती हे पैलू महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. केवळ अणुबाँबचा विचार केल्यास भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांकडे प्रत्येकी जवळपास १७० च्या आसपास अणुबाँब आहेत. परंतु, पाकिस्तानची अण्वस्त्रे पहिल्यापासूनच परिष्कृत युरेनियम पासून बनवली आहेत. ती आकाराने मोठी आणि एक ते दीड टन वजनाची आहेत. अशी मोठी अण्वस्त्रे क्षेपणास्त्रावर बसवण्यास लागणारे तंत्रज्ञान पाकिस्तानकडे आहे का, याबद्दल दाट शंका आहे. त्यामुळे पाकिस्तान आपली क्षेपणास्त्रे दाखवत असला तरी प्रत्यक्षात अणुबाँब टाकण्यासाठी तो विमानांवरच अवलंबून आहे. क्षेपणास्त्रांविरुद्ध बचावाची प्रणाली निर्माण करणे अत्यंत कठीण आहे. अगदी इस्त्रायलसारख्या देशावरही हमास, सीरिया आणि इराणने क्षेपणास्त्राचा मारा केलेला आहे. परंतु, अण्वस्त्र घेऊन जाणारे विमाने थांबवणे वा पाडणे तुलनात्मकदृष्ट्या सोपे आहे. मुख्य म्हणजे पाकिस्तानकडे भारताइतकीच अण्वस्त्रे असली तरी ती लक्ष्यावर पोहोचण्याआधी हवेतच उडवून देण्याची क्षमता भारताकडे आहे. पाकिस्तान आपली क्षेपणास्त्रे अण्वस्त्रसज्ज असल्याचे म्हणतो तेव्हा खोटे बोलत असतो. इतिहास तपासून पाहिला असता अशी अनेक उदाहरणे दिसून येतात. उदाहरणार्थ १९७१ च्या युद्धात भारताने कराचीवर हल्ला करुन तेथील पेट्रोलच्या साठ्याला आग लावली होती. तेव्हा पाकिस्तानने ती छायाचित्रे मुंबईची आहेत, असे जगाला सांगितले होते. बांगलादेशात शरणागती पत्करण्याच्या दिवसापर्यंत पाकिस्तान आपण युद्ध जकत आहे, असेच जनतेला सांगत होते. त्यामुळे पाकिस्तान याही बाबतीत खोटे बोलत आहे, हे नक्की. पाकिस्तानकडे योग्य तंत्रज्ञान असते तर आत्तापर्यंत भारताप्रमाणे पाकिस्ताननेही आपल्या क्षेपणास्त्राद्वारे अंतरिक्षात ग्रह सोडले असते. आजपर्यंत पाकिस्तानने आपल्या रॉकेटद्वारे उपग्रहाचे प्रक्षेपण केलेले नाही. याउलट, भारताकडे असलेली 'अग्नी'सारखी क्षेपणास्त्रे पाणबुड्यांवरही लावली आहेत. पाकिस्तान ती नष्ट करु शकत नाही. त्यामुळे अगदी पाकिस्तानने प्रथम अण्वस्त्रे वापरुन हल्ला केला तरीही क्षेपणास्त्राद्वारे प्रतिहल्ल्या करत पाकिस्तानला पूर्ण बेचिराख करण्याची क्षमता भारताकडे आहे. दोन्ही देशांमधील अण्वस्त्रांच्या संदर्भात हा असमतोल समजून घेण्याची गरज आहे. याची जाण असल्यामुळेच पाकिस्तानसाठी अण्वस्त्रांचा वापर म्हणजे आत्मघाती हल्ला होय.

या सर्व पार्श्वभूमीवर सध्या भारत-पाकिस्तानदरम्यान एकमेकांवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन वापरुन हल्ले केले जात आहेत. मात्र आत्तापर्यंत कोणत्याही देशाने उन्नत प्रतीची क्षेपणास्त्रे एकमेकांविरुद्ध वापरलेली नाहीत. त्यामुळे हे क्षेपणास्त्रांचे युद्ध कवा ड्रोनचा वापर फार काळ चालू शकत नाही. या युद्धामध्ये भारताकडे स्वदेशी बनावटीची विमानभेदी क्षेपणास्त्रे 'आकाश' आणि रशियाकडून घेतलेली 'एस ४००' ही प्रणाली पाकिस्तानच्या विमानभेदी प्रणालींपेक्षा अनेक पटींनी परिणाम कारक आहे. परिणामस्वरुप भारताचे ड्रोन पाकिस्तानात गेले आणि त्यांनी निशाण्यांवर हल्ले केले. मात्र प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानने पाठवलेल्या क्षेपणास्त्रे खूप मोठ्या प्रमाणात निकामी करण्यात आपण यशस्वी झालो. त्यातच भारताने कराची बंदराची नाकेबंदी केली. त्यामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था (जी आधीच डबघाईला आली आहे) आणखीच मरणपंथाला लागण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे आर्थिक आणि सामरिक या दोन्ही आघाड्यांवर पाकिस्तानवर जबरदस्त दबाव आहे. भूतकाळाचा विचार केला तर ही 'गझवा ए हद' ची घोषणा काही नवी नव्हे. १९४७ मध्ये काश्मीरमध्ये पाकिस्तानी टोळीवाल्यांनी आपल्या गाड्यांवर 'चलो दिल्ली' असे लिहिले होते. अगदी १९७० च्या दशकापर्यंत पाकिस्तानमध्ये एक घोषणा नेहमी दिली जायची, ती म्हणजे 'हसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हदुस्तान'. अशी घोषणा देत हा देश आज कोणत्या वळणावर येऊन पोहोचला, हे अवघे जग पहात आहे. सर्वसामान्य पाकिस्तान्याला एक पाकिस्तानी दहा हदूंच्या बरोबरचा आहे, असे खरोखरच वाटायचे. १९६५ च्या युद्धात पाकिस्तानी सैन्याचे अनेक रणगाडे पकडले गेले. त्यात मिळालेल्या गुप्त दस्तावेजामध्ये पाकिस्तानची तेव्हादेखील दिल्लीपर्यंत जाण्याची योजना असल्याचे दिसून आले होते. या सर्व पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तानदरम्यान जेव्हा जेव्हा युद्ध झाले आणि त्यात त्यांचा पराजय झाला, तेव्हा तेव्हा पाकिस्तानमध्ये सत्ताबद्दल झाल्याचे दिसले आहे. १९६५ च्या युद्धात काश्मीर घेण्यात अपयश आल्यानंतर अयुब खान यांना सत्तेतून पायउतार व्हावे लागले. १९७१ च्या युद्धानंतर जनरल खान यांचा तक्तापलट झाला. १९९९ मध्ये कारगीलमधील युद्ध हरल्यानंतर नवाज शरीफ यांना हटवण्यात आले. आजपर्यंतची ही परंपरा बघितली तर येत्या काही दिवसांमध्ये आपली कातडी वाचवण्यासाठी पाकिस्तानमध्ये सत्ताबदल होण्याची दाट शक्यता दिसून येते. सध्याचे नामधारी पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि सैन्याचे प्रमुख (पाकिस्तानचे खरे राजकर्ते) जनरल आसीफ मुनिर या दोघांची उचलबांगडी केली जाऊन इम्रान खान सत्तेत येण्याची दाट शक्यता आहे. भुत्तोंनी १९७२ मध्ये आणि जनरल मुशर्रफ यांनी २००२ मध्ये भारताशी शांततेसाठी बोलणी सुरू केली, त्याप्रमाणेच चर्चेचे गुऱ्हाळ पुन्हा सुरू होण्याची दाट शक्यता आहे. परंतु यावेळी पाकिस्तानची गाठ पंतप्रधान मोदींशी आहे. त्यांनी कारकिर्दीच्या सुरूवातीलाच पाकिस्तानबरोबर शांतता निर्माण करण्यासाठी खूप प्रयत्न केले. पण त्याचा काहीही परिणाम न होता पाकिस्तानची तिरकी चाल सुरूच राहिली. पंतप्रधान मोदी परत पाकिस्तानच्या भूलथापांना बळी पडतील अशी शक्यता दिसत नाही.

# चीनला फटका, भारतीय निर्यातीचा झटका

### अर्थनगरीतून

**- महेश देशपांडे**
आर्थिक घडामोडींचे जाणकार



अर्थनगरीमध्ये 'टॅरिफ वॉर'चे 'आफ्टरशॉक्स' पहायला मिळत आहेत. त्यातल्या त्यात अमेरिका-चीन 'टॅरिफ वॉर'चे परिणाम दिसू लागले असून चीनची अर्थव्यवस्था धोक्यात येत असल्याचे चित्र आहे. सुदैवाने भारताला कोणताही झटका बसला नसून देशाची वेगवान आर्थिक वाटचाल सुरु आहे. निदान निर्यातीचे ताजे आकडे तरी हेच दर्शवतात. दरम्यान, भारतीय स्मार्टफोन बाजारात ॲपलने अव्वल स्थान पटकावले आहे.

एव्हाना अमेरिका-चीन 'टॅरिफ वॉर'चे परिणाम दिसू लागले असून चीनची अर्थव्यवस्था धोक्यात येत असल्याचे चित्र आहे. सुदैवाने भारताला असा कोणताही मोठा झटका बसला नसून देशाची वेगवान आर्थिक वाटचाल सुरु आहे. निदान निर्यातीचे ताजे आकडे तरी हेच दर्शवतात. दरम्यान, भारतीय स्मार्टफोन बाजारात ॲपलने अव्वल स्थान पटकावले आहे.

जगातील दोन सर्वात दोन मोठे देश असलेल्या अमेरिका आणि चीनमध्ये सुरू असलेल्या व्यापारयुद्धाने धोकादायक वळण घेतले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्काचा (आयात शुल्क) चीनच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. त्याच वेळी, भारताने आपली करप्रणाली कडक करण्याचा आणि बनावट सवलती आणि कपातींवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या मते अमेरिकेने ट्रम्प यांनी लादलेले शुल्क २०२५ अखेरपर्यंत सुरू ठेवल्यास चीनची अमेरिकेतील निर्यात ७७ टक्क्यांनी कमी होऊ शकते. २०२४ मध्ये अमेरिकेने चीनमधून अंदाजे ४४० अब्ज डॉलर्सच्या वस्तू आयात केल्या; परंतु २०२५ मध्ये त्यात मोठी घट अपेक्षित आहे. दरम्यान, चीनच्या अर्थव्यवस्थेवर ट्रम्प यांनी लादलेल्या आयात शुल्काचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे. आपल्यावर या व्यापारयुद्धाचा परिणाम होत नसल्याचे भासवत असला तरी चीन या व्यापारयुद्धा मुळे दबावाखाली आला आहे. चीनची अर्थव्यवस्था कोरोनानंतरच्या मंदी, कमकुवत देशांतर्गत मागणी आणि रिअल इस्टेट संकटाशी अगोदरच झुंजत आहे. चीनच्या औद्योगिक आरोग्याचा मोजमाप मानला जाणारा खरेदी व्यवस्थापक निर्देशांक (पीएमआय) एप्रिलमध्ये ४९ पर्यंत घसरला. मार्चमध्ये हा आकडा ५०.५ होता. ५० पेक्षा कमी गुण मिळाल्यास उद्योगांची संख्या कमी होत असल्याचे दिसून येते. हे स्पष्ट आहे की अमेरिकन शुल्कामुळे चीनच्या उत्पादनावर परिणाम होत आहे, निर्यात मंदावली आहे, बेरोजगारी वाढत आहे आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात विलंब होत आहे.

चीनमधील तांब्याचे साठे झपाट्याने कमी होत आहेत. ही गती कायम राहिल्यास जूनपर्यंत हा साठा पूर्णपणे संपुष्टात येऊ शकतो. अमेरिकेतून तांब्याची प्रचंड मागणी आणि संभाव्य शुल्काच्या भीतीमुळे जगभरातून चीनला होणारा तांब्याचा पुरवठा खंडित झाला आहे. 'मर्कुरिया'सारख्या प्रमुख व्यापारी कंपन्यांनी याला 'इतिहासातील सर्वात मोठा पुरवठा धक्का' म्हटले आहे. परिस्थिती इतकी वाईट आहे की चीनला अमेरिकन तांब्यावर लादलेल्या करातून सूट मागावी लागत आहे. चीन सरकार उघडपणे झुकण्यास तयार नसले तरी पडद्यामागे वेगळाच खेळ सुरू आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार चीनने व्हाइट लिस्ट तयार केली आहे. ही अशा अमेरिकन उत्पादनांची यादी आहे, ज्यांना टॅरिफमधून सूट दिली जाईल. यामध्ये औषधे, चिप्स आणि विमान इंजिन यासारख्या महत्त्वाच्या उत्पादनांचा समावेश आहे. कंपन्यांशी वैयक्तिकरित्या संपर्क साधला जात असून त्यांच्या उत्पादनांना सूट मिळू शकते, हे सांगण्यात येत आहे. आर्थिक तज्ज्ञांचा विश्वास आहे की या वर्षी चीनचा विकास दर फक्त ३.५ टक्के असू शकतो. तेथिल उत्पादन क्षेत्र कमकुवत असून सेवा क्षेत्रदेखील घसरत आहे. तसेच बाजारातील आत्मविश्वासही कमी होत चालला आहे.

रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार मार्च २०२५ मध्ये सेवा व्यापारासह भारताची एकूण निर्यात ८२४.९ अब्ज डॉलर या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या ७७८.१ अब्ज डॉलर निर्यातीच्या तुलनेत ही वाढ ६.०१ टक्के आहे. सेवा निर्यातीने वाढीची गती कायम ठेवली आहे. २०२५ मध्ये ती ३८७.५ अब्ज डॉलर या ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचली. गेल्या वर्षीच्या ३४१.१ अब्ज डॉलरपेक्षा ती १३.६ टक्के जास्त आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार मार्च २०२५ मध्ये सेवा निर्यात ३५.६ अब्ज डॉलर्स होती. मार्च २०२४ मध्ये ती ३०.० अब्ज डॉलर्स झाली. म्हणजेच त्यात १८.६ टक्के वाढ झाली. २०२५ मध्ये पेट्रोलियम उत्पादने वगळता व्यापारी मालाची निर्यात विक्रमी ३७४.१ अब्ज डॉलर झाली. २०२४ मध्ये ती ३५२.९ अब्ज डॉलर होती. ती सहा टक्क्यांनी वाढली. ही आतापर्यंतची सर्वाधिक वार्षिक बिगर-पेट्रोलियम वस्तूंची निर्यात आहे.

वाणिज्य मंत्रालयाने १५ एप्रिल रोजी जाहीर केलेल्या पूर्वीच्या आकडेवारीनुसार ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात भारताची एकूण वस्तू आणि सेवा निर्यात ५.५ टक्क्यांनी वाढून विक्रमी ८२०.९३ अब्ज डॉलर झाली आहे. तथापि, त्या वेळी रिझर्व्ह बँकेने सेवा निर्यातीचा प्रत्यक्ष डेटा संकलित केला नव्हता आणि निर्यात मोजण्यासाठी ढोबळ अंदाज वापरला होता. आता प्रत्यक्ष आकडेवारी येत असल्याने, एकूण मूल्यात वाढ नोंदवली गेली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या करवाढीचा जागतिक व्यापारावर परिणाम होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, भारत आणि अमेरिका लवकरच द्विपक्षीय व्यापार करारावर पोहोचण्यासाठी चांगल्या स्थितीमध्ये आहेत. चालू चर्चेचा एक भाग म्हणून भारताच्या वाणिज्य विभागाचे आणि अमेरिकन व्यापार प्रतिनिधी कार्यालयाचे प्रतिनिधी २३-२५ एप्रिल रोजी वॉशिंग्टनमध्ये भेटले आणि २०२५ च्या शरद ऋतूपर्यंत (सप्टेंबर-ऑक्टोबर) द्विपक्षीय व्यापार कराराचा पहिला टप्पा पूर्ण करण्यावर चर्चा केली. मार्च २०२५ मध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या पहिल्या द्विपक्षीय चर्चेचा हा पाठपुरावा होता. वॉशिंग्टन, डीसी येथील बैठकीमध्ये टीमने टॅरिफ आणि नॉन-टॅरिफ बाबींचा समावेश असलेल्या विविध विषयांवर चर्चा केली. टीमने २०२५ च्या शरद ऋतूपर्यंत परस्पर फायदेशीर, बहु-क्षेत्रीय द्विपक्षीय व्यापार कराराचा पहिला टप्पा पूर्ण करण्याच्या मार्गावर चर्चा केली.

दरम्यान, भारतीय स्मार्टफोन बाजारात वेगाने बदल होताना दिसत आहेत. एके काळी देशातील आघाडीची स्मार्टफोन कंपनी असलेली 'शाओमी' आता मूल्य हिस्सेदारीच्या बाबतीत टॉप ५ ब्रँडमधून बाहेर पडली आहे, तर ॲपल पहिल्यांदाच मूल्याच्या आधारावर भारतातील स्मार्टफोन बाजारपेठेतली अव्वल कंपनी बनली आहे. 'काउंटरपॉइंट रिसर्च'च्या अहवालानुसार २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये 'शाओमी'चा घाऊक मूल्य हिस्सा पाच टक्क्यांपर्यंत घसरण्याची अपेक्षा आहे. २०२४ च्या पहिल्या तिमाहीमध्ये हा हिस्सा दहा टक्के होता. २०२० च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये हा हिस्सा १९ टक्के होता. दुसरीकडे २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये घाऊक विक्रीत 'ॲपल'चा वाटा २६ टक्के झाला. गेल्या वर्षीच्या याच कालावधीत तो वीस टक्के होता. या काळात, 'ॲपल'ने सॅमसंग, विवो, ओप्पो आणि शाओमीसारख्या ब्रँडना मागे टाकत प्रथमच अव्वल स्थान मिळवले आहे. या सर्व स्पर्धक ब्रँड्सचा वाटा सरासरी दोन टक्क्यांनी कमी झाला आहे.

२०२४ च्या पहिल्या तिमाहीमध्ये सॅमसंग अव्वल स्थानी होता. त्यानंतर ॲपल, विवो, ओप्पो आणि शाओमी यांचा क्रमांक लागतो. २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये मोटोरोला आणि गुगल या फक्त दोन ब्रँड्सने बाजारातील वाटा वाढवला. 'मोटोरोला'चा हिस्सा दुप्पट होऊन चार टक्के झाला. 'गुगल पिक्सेल'चा वाटा एक टक्क्यावरून दोन टक्क्यांपर्यंत वाढला. त्याच वेळी 'नथिंग'चा वाटा एक टक्काच राहिला. 'काउंटरपॉइंट रिसर्च'चे संशोधन प्रमुख तरुण पाठक यांच्या मते कोरोनानंतर भारतात प्रीमियम स्मार्टफोन खरेदी करण्याचा ट्रेंड झपाट्याने वाढला आहे. ॲपल, सॅमसंग आणि व्हिवो सारख्या ब्रँड्सनी हा ट्रेंड ओळखला आणि 'ईएमआय' आणि 'फायनान्सिंग' योजनांद्वारे ग्राहकांपर्यंत पोहोचले. यामुळेच हे ब्रँड पुढे जाऊ शकले. या ब्रँड्सचे सुमारे ५० टक्के फोन कर्ज योजनांअंतर्गत खरेदी केले गेले होते.

# खा. लंकेंच्या गाण्यांना ५५ मिलियन व्ह्यूज

## इंस्टा, फेसबुक, युटयुबवर विक्रमी चाहते; गाण्यांना अभूतपूर्व प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : राज्याच्या राजकारणात अल्पावधीमध्ये विशेष स्थान निर्माण करणाऱ्या खा. नीलेश लंके यांच्या विविध उपक्रमांवर आधारीत तयार करण्यात आलेल्या गाण्यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून या गाण्यांना इंस्ट्राग्राम, फेसबुक तसेच युटयुब आदी पब्लिक डोमेनवर तब्बल ५५ मिलियन (५ कोटी ५० लाख) व्ह्यूज मिळाल्या असून तो विक्रम मानला जातो.

खा. लंके यांनी विधानसभा निवडणूकीत यश संपादन करण्यापूर्वीपासून त्यांचा राज्यभरात मोठा चाहता वर्ग असून अनेक गीतकार तसेच संगीतकारांनी त्यांच्या विविध उपक्रमांवर गीते तयार केली असून अनेक नामवंत गायकांनी ही गीते गायली आहेत.

खा. लंके हे कोरोना संकटात देवदूत म्हणून संपूर्ण देशासमोर आले. त्यानंतर राज्यातच नव्हे तर देशाच्या विविध भागांमधून त्यांचे फॉलोअर्स वाढले. त्यामुळे लंके यांच्यावरील गाण्यांना केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरातून पसंती मिळाली आहे.

विधानसभा निवडणूकीमध्ये तब्बल ६० हजार मतांनी विजयी होउन जायंट किलर म्हणून नावारूपास आलेले खा. लंके हे माध्यमप्रतिनिधींच्या गळयातील ताईत बनले आहेत. राजकीय क्षेत्रातील कोणताही विषय असो, खा. लंके यांच्या प्रतिक्रियेसाठी माध्यम प्रतिनिधी त्यांचा तात्काळ शोध घेतात. कोरोना संकटानंतर खा. लंके यांची क्रेझ आणखीच वाढली. खा. शरद पवार व पवार कुटूंबियांशी अल्पावधीत जोडले गेलेले व्यक्तिमत्व म्हणून खा. लंके यांच्याकडे पाहिले जात असून त्यांनी घेतलेले अनेक निर्णय हे आजवर बातमीचा विषय ठरले आहेत.

### संपूर्ण टीमसाठी विशेष दिवस

खा. लंके यांच्यावरील गाणी तसेच सोशल मीडियाचे समन्वयक म्हणून काम करणारे मनोज शिंदे यांनी खा. लंके यांच्या गाण्यांना सर्वाधिक व्ह्ज मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. लोकनेते नीलेश लंके यांच्यावर गाणी तयार करण्याची संधी मला मिळाली याचा मला अभिमान वाटतो, मी भाग्यवान आहे, आजचा दिवस माझ्यासाठी आणि आपल्या संपूर्ण टीमसाठी अत्यंत विशेष आहे.

### आता कॉलर टयुनही

राजकीय नेत्यांमध्ये सर्वाधिक व्हूज असलेली गाणी अशी नोंद पब्लिक डोमेनमध्ये झाली असून काही गाणी विविध मोबाईल कंपन्यांच्या कॉलर टयुनमध्येही समाविष्ट झाली आहे. आता खा. लंके यांचे चाहते या गाण्यांची कॉलर टयुनही लाऊ शकतात.



# राहुरीतील डॉ. कुलकर्णींना डॉक्टरेट पदवी प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : शहरातील डॉ. शांताराम व स्व. डॉ. सुनीला कुलकर्णी वहिनी यांचे नातू व सर्जन डॉ. जयंत कुलकर्णी व डॉ. चेतना कुलकर्णी यांचे चिरंजीव डॉ. इंद्रनील कुलकर्णी यांनी डॉक्टरेट पदवी मिळविली.

डॉक्टरेट ऑफ नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन गॅस्ट्रो इंटरॉलॉजी पोटाचे विकार तज्ञ या परीक्षेत यश संपादन करून डॉक्टरेट पदवी मिळविली. वैद्यकीय शास्त्रातील एमबीबीएसच्या शिक्षणानंतर कराड येथील कृष्णा मेडिकल फाउंडेशन येथे एमडी मेडिसिनचे शिक्षण डॉ. इंद्रनील यांनी प्राप्त केले.

त्यानंतर जगप्रसिद्ध सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल मोहाली पंजाब या संस्थेतून त्यांनी गॅस्ट्रोलॉजी मधील ही सुपर स्पेशलिटी पदवी प्राप्त केली. त्यांनी पोटाचे आजाराविषयी सखोल ज्ञान प्राप्त केले आहे व या विषयातील अत्याधुनिक उपचार पद्धतीमध्ये त्यांनी प्रभुत्व मिळविले आहे.

कुलकर्णी घराण्याची वैद्यकीय सेवेतील डॉ. इंद्रनील ही चौथी पिढी असून राहुरी तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील वैद्यकीय सेवेचा वारसा पुढे चालू ठेवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

### डॉ. कुलकर्णीवर शुभेच्छांचा वर्षाव

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, माजी खासदार प्रसाद तनपुरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे, सुरेशराव वाबळे, शिवाजी कपाळे, डॉ. आशिष पाटील, विजय डौले, डॉ. संजय म्हसे, डॉ. सोपान हारदे, रावसाहेब तनपुरे आदींसह मान्यवरांनी डॉ. कुलकर्णी यांचे अभिनंदन केले.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## शेतकऱ्यांनो, उत्पादनवाढीसाठी तंत्रज्ञान वापरा

शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी, यासाठी योजनांची पुस्तिका प्रकाशित करावी. योजनांची माहिती समाजमाध्यमांद्वारेही द्यावी. तालुकास्तरावर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगामपूर्व बैठकांचे आयोजन करून या बैठकीत तालुक्यातील आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान करावा. या बैठकीस शेतकऱ्यांना आमंत्रित करावे. कृषी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी आणि शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी संवाद साधावा, अशा सूचनाही पालकमंत्री विखे पाटील यांनी यावेळी दिल्या. गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेतील लाभाची व्याप्ती वाढवावी. शेतकऱ्यांनी पारंपरिक पीक पद्धतीत बदल करून अधिक उत्पन्न देणाऱ्या नगदी पिकांकडे वळावे. यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शन करावे. प्रधानमंत्री पीक विम्याच्या नवीन लाभ प्रक्रियेविषयी शेतकऱ्यांमध्ये जागृती करावी. शेतकऱ्यांचे प्रश्नसोडविण्यासाठी ऑनलाईन तक्रार निवारण यंत्रणा उभारावी, विनाशुल्क हेल्पलाईन सुरू करावी. कालबाह्य योजनांचा आढावा घेऊन कृषी आयुक्तांना अहवाल सादर करावा. शेतकऱ्यांनी मिळणाऱ्या विविध अनुदानातून बचत करून शेतीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर चालणारे ड्रोन खरेदी करावेत व त्याचा उपयोग उत्पादनवाढीसाठी करावा. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. खरीप हंगाम उत्साहवर्धक व चांगले उत्पन्न देणारा ठरेल. शेतकऱ्यांच्या जीवनात सुख व समृद्धी यावी, अशी अपेक्षा व्यक्त करत कृषी विभागाने सुरू केलेला 'शेतकरी डॉक्टर' उपक्रम तसेच 'शेतीचा सखा' चॅटबोट उपक्रम शेतकऱ्यांसाठी निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेस पात्र शेतकऱ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बोराळे यांनी खरीप हंगामासाठी कृषी विभागाने केलेले नियोजन व विविध योजनांची अंमलबजावणी याचे सादरीकरण केले. यावेळी कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी उपस्थित होते. या शेतकऱ्यांशीही पालकमंत्र्यांनी थेट संवाद साधला. बैठकीपूर्वी, कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, मळणीयंत्र व कंबाईन हार्वेस्टरचे वितरण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत मंजुरीपत्राचे वितरणही करण्यात आले.

## ...अबब ड्रग्जनंतर आता लाखोंचाही गांजा जप्त

होती. त्यानुसार, पोलिसांनी श्रीरामपूर-पुणतांबा मार्गावर सापळा रचून गुरुवारी रात्री उशिरा संशयित महिंद्रा एक्सयुव्ही ५०० गाडी एमएच ०२ इइ ६९९९ पुणतांबा बाजूकडून श्रीरामपूरकडे येताना दिसली. पोलिसांनी गाडी थांबवून झडती घेतली असता, गाडीत मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ रमेश जाधव आणि ज्ञानेश्वर जाधव या दोघांना ताब्यात घेतले आणि गाडीसह २०१ किलो गांजा जप्त केला. जप्त केलेल्या गांजाची किंमत लाखो रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. आरोपींविरोधात अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये (एन.डी.पी.एस. ॲक्ट) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून, यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता पोलीस निरीक्षक देशमुख यांनी व्यक्त केली आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपूजे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, उपनिरीक्षक रोहिदास ठोंबरे, पोलीस उपनिरीक्षक दिपक मेढे, पोलीस नाईक शरद आहिरे आदींनी यशस्वीपणे पार पडली.

## तोतया पोलीस अधिकारी गजाआड

तो वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे करत तसेच ही दुचाकी चोरीची असल्याचे समोर आले असून शिर्डीत तो याच दुचाकीवरुन फिरताना पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. आरोपी जाकीर हुसेन युसूफ खान उर्फ जग्गू इरानी या नावाने तो गुन्हेगारी क्षेत्रात प्रचलित आहे. श्रीरामपुर येथिल हा राहणारा असून त्याच्याकडे विविध ओळखपत्र देखील मिळून आले. याने विविध राज्यात फसवणुकीचे गुन्हे केले आहेत. तो स्वतःला केंद्रीय तपास यंत्रणांचा अधिकारी असल्याचे सांगायचा. शिर्डीमध्येही त्याने वयोवृद्धांची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले असून शिर्डी पोलीसांनी त्याला वेळेवर कारवाई करत पकडले. त्याच्याविरोधात आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिर्डी पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि सुसूत्र नियोजनामुळे एक सराईत भामटा गजाआड गेला असून, नागरिकांनी अशा बनावट आणि भामट्यांपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## लग्नाच्या सात दिवस आधीच डॉक्टरचा अपघातात मृत्यू

रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याला ताबडतोब उपचारासाठी जामखेड येथील खाजगी दवाखाना घेऊन गेले. मात्र पुर्वीच त्याचा मृत झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. डॉ. जाधव हा दोन वर्षांपासून मुक्या प्राण्याची सेवा करत होता. दोन वर्षापासून तो व्हिटरनरी डॉ. म्हणून परिसरात प्रसिद्ध होता. जामखेड तालुक्यातील नाहुली येथील प्रल्हाद जाधव याने काही दिवस जामखेड शहरातील एका मेडिकलमध्ये नोकरी केली होती. यानंतर दोन वर्षांपूर्वी व्हिटरनरी कोर्स केला व व्यवसाय सुरू केला. अत्यंत गरीब परिस्थितीत त्यांनी व्यवसायात चांगला जम बसविला होता. डॉ. प्रल्हाद जाधव यांचे येत्या २३ रोजी लग्न होते. घरात लग्नाची तयारी चालली होती आणी नियतीने जाधव कुटुंबियांवर अघात केला आहे. डॉ. जाधव यांच्या मागे आई-वडील व एक लहान भाऊ असा परिवार आहे. जामखेड पोलीसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# सुभान तांबोळी यांचे उपोषण सुरूच



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** आढळगावं ते जामखेड राष्ट्रीय महामार्ग ५४८ डीचे मागील २ वर्षा पासून रखडलेले काम जानेवारी महिन्यात निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष सुभान तांबोळी यांनी ४ दिवस उपोषण केले होते. त्यानंतर १९ जानेवारीला प्रत्यक्षात काम चालू होऊन त्यांचे उपोषण सोडण्यात आले होते. ते काम निखिल कन्ट्रक्शन ठेकेदार यांच्याकडून आठ दिवसांत बंद करण्यात आले. त्यानंतर सुभान तांबोळी यांनी १३ मे रोजी त्याच कामा साठी उपोषण चालू केले आहे.

उपोषणाला ४ दिवस उलटूनही राष्ट्रीय महामार्गच्या अधिकाऱ्यांनी त्यांची व त्यांच्या मागणीची दखल घेतली नाही. अपूर्ण राहिलेले कामामुळे अपघात होऊन कित्यके जीव गेले व जातात याचे त्यांना काहीच गांभीर्य नाही.

या मुजोर अधिकारी व निखिल कॉन्ट्रॅक्शन ठेकेदार यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सुभान तांबोळी व आढळगावं ग्रामस्थांकडून होत आहे. या उपोषणास आढळगाव पंचक्रोशीतून मोठ्या प्रमाणात पाठिंबा आहे.

या वेळी मा. जिल्हा प.अध्यक्ष बाबासाहेब भोस, सुभाष शेठ गांधी, देविदास गव्हाणे, महेश दरेकर, खरेदी विक्री देखरेख संघ व्हा.चेअरमन शरद जमदाडे, पंचायत समिती सदस्य हौसराव भोस, सरपंच देवराव वाकडे, तुकाराम वाकडे, उपसरपंच अंबादास चव्हाण, ग्राप. स. ऊत्तम राऊत, मच्छिंद वडकर, सोसायटी चेअरमन राजू गदादे, अशोक ढवळे, पोपट गुगळे, गणेश शिंदे, शेखर गव्हाणे, भानूदास ठवाळ, बाळकृष्ण ठवाळ, ज्ञानदेव भैलुमे आदींनी उपोषणास पाठिंबा दिला.

# काहींनी पाण्यापासून वंचित ठेवण्याचे केले पाप

## धनश्रीताई विखे : कन्हार ओढा जलाशयाचे पूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** स्व. बाळासाहेब विखे पाटील यांचे स्वप्न अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जलसंपदा खात्यामार्फत सुरू आहे.



काहींनी स्वतःला जलनायक म्हणवून घेत जाणीवपूर्वक शिर्डी मतदारसंघातील आश्वी बुद्रुक, निमगावजाळी, सादतपूर, औरंगपूर या गावांच्या प्रस्तावित निळवंडे धरणाच्या चाऱ्या हेतुपुरस्कर मागे ठेवण्याचे पाप केले, अशी टीका रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्ष धनश्रीताई विखे यांनी केली.

दत्त टेकडी, कन्हार ओढा आश्वी बुद्रुक (ता. सगंमनेर) येथील जलाशयाचे पूजन रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्ष धनश्रीताई विखे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. धनश्रीताई विखे म्हणाल्या, की भर उन्हाळ्यात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारनेच आपल्या परिसरातील तळे तुडुंब भरले आहे. आपण या पाण्याचा योग्य रीतीने वापर करावा. या पाण्यामुळे आश्वी बुद्रुक तसेच निमगावजाळी परिसरातील हजारो एकर जिरायती क्षेत्र ओलिताखाली आले आहे. भविष्यातही गरज पडल्यास शेतीसाठी पुन्हा एखादे आवर्तन साडण्यात येईल.

यावेळी मांची हिल संकुलनाचे संस्थापक शाळिग्राम होडगर, उपकार्यकारी अभियंता (निळवंडे विभाग) संदीप वलवे, कारखान्याचे संचालक विजयराव म्हसे, प्रवरा बँकेचे संचालक अजय ब्राह्मणे, मंच्छिद्र थेटे, भाऊसाहेब जऱ्हाड, ॲड रोहिणी निघते श्रीरामटत पतसंस्थेचे चेअरमन भाऊसाहेब डेंगळे, सेवानिवृत्त जिल्हाधिकारी शिवाजीराव जोंधळे, उपसरपंच सुरेश डेंगळे, माजी सरपंच अमोल जोधंळे, इंजिनिअर अभिजित म्हसे, सुभाष होडगर, शुभम जऱ्हाड यांच्यासह लाभार्थी शेतकरी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

आपल्या परिसराला पाणीदार करण्याचे काम पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटिल यांच्या पुढाकाराने व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. यामुळे ५० वर्षांहून अधिक काळ रखडलेल्या निळवंडे चाऱ्यांचे काम युध्दपातळीवर पूर्ण करण्यात आले. पौडीएअंतर्गत होणाऱ्या आश्वी पाईपलाईनचे काम पावसाळ्याआधी सुरू केल्यास आश्वी बुद्रुक, निमगावजाळी व चिंचपूर येथील ७० टक्के शेती पाण्याखाली येणार असल्याचे सेवानिवृत्त जिल्हाधिकारी शिवाजीराव जोंधळे यांनी सांगितले.

### पाणी १४ दिवस सुरू राहणार

▶ निळवंडे चारीतून पीडीएअंतर्गत येणाऱ्या पाईपलाईनवरून २५ हेक्टर गटाअंतर्गत ८ हेक्टरवर बारे काढण्यात आले आहे. २५ हेक्टर क्षेत्र हे १४ दिवसांच्या रोटेशनवर भरायचे आहे. विद्युतपुरवठा नसला तरी पाणी २४ तास सुरू राहणार असून, यामुळे प्रत्येक रोटेशनला शेतकऱ्यांना ते मिळणार असल्याचे धनश्रीताई विखे यांनी सांगितले.

# नेहरू भाजी मार्केट व्यापारी संकुलाजवळ कचऱ्याची दुर्गंधी

## कोपरगावच्या नागरिकांचे आरोग्य आले धोक्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** शहरातील भाजी मंडई अर्थात नेहरू भाजी मार्केट समोर कचरा पडलेला असून सकाळी भाजी मार्केटमध्ये भाजी खरेदी करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना तोंडाला रुमाल बांधण्याची वेळ आली असून कोपरगाव नगरपरिषदेच्या या भोंगळ कारभारामुळे कोपरगावकर नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.




गुरुद्वारा मार्गावर तहसील, पंचायत समिती, एलआयसी, भू-आलेखन असे कार्यालये असून तसा हा रस्ता नेहमीच वर्दळीचा असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना या दुर्गंधीमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच एस. जी. विद्यालयाच्या मागे बालाजी आंगण मार्गावर रस्त्याच्या कडेला कचरा टाकल्यामुळे इंदिरानगर, १०५ भागातून शहरात येणाऱ्या नागरिकांना रस्त्याने जातांना येतांना या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

या दुर्गंधीमुळे आजाराचा प्रसार होत आहे. याकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. भाजी मार्केट गुरुद्वारा रोडवरील साचलेला कचरा हा नागरिकांच्या आरोग्यासाठी मोठा धोका निर्माण झाला आहे.

या अगोदर कचरा संकलन करण्यासाठी नगरपरिषद ट्रॅक्टरची ट्रॉली रात्री लावून ठेवत होते. मात्र काही दिवसापासून ती ट्रॉली लावणे बंद केले. त्यामुळे नागरिकांना या दुर्गंधीमुळे त्रास होत आहे. याकडे नगरपरिषदेने लक्ष द्यावे अशी माफक अपेक्षा नागरिकांनी प्रशासनाकडे व्यक्त केली आहे.

### संसर्गजन्य आजारांना निमंत्रण

▶ कचऱ्यामुळे शहरात संसर्गजन्य आजार वाढत आहेत. रस्त्याच्या कडेला सडलेला सेंद्रिय कचरा, अन्न, विषबाधा अन गॅस्ट्रोएन्टेरायटिस सारखे आजार पसरवतो व कचरा कुजतांना तयार होणाऱ्या वायूमुळे हवेत प्रदूषण होते. पाऊस येऊन तो कचरा पाण्यात वाहून जातो. तेव्हा पाणी प्रदूषण व जलजन्य रोग होतात. तेव्हा नगरपरिषदेने शहरात सह उपनगरांमध्ये साठलेला कचरा त्वरित हटवावा, अशी कोपरगावकर नागरिकांची नगर परिषदेकडे मागणी आहे.

# पाथर्डीत उद्या भव्य तिरंगा पदयात्रा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २७ भारतीय पर्यटकांच्या हत्येनंतर भारतीय लष्कराने यशस्वीरित्या राबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या प्रत्युत्तर कारवाईच्या समर्थनार्थ आणि लष्कराच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी पाथर्डी येथे रविवार, दि. १८ मे रोजी भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेला सकाळी ८ वाजता वीर सावरकर मैदान, बाजरतळ पाथर्डी येथून सुरुवात होणार आहे.दहशतवाद्यांनी केलेल्या निर्दय हल्ल्याचा बदला घेत भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. या पराक्रमाच्या पार्श्वभूमीवर देशभरात तिरंगा पदयात्रांचे आयोजन करण्यात येत असून पाथर्डीतील राष्ट्रप्रेमी नागरिकांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.या तिरंगा पदयात्रेत विविध सामाजिक संस्था, समविचारी संघटना, महिलासंघटना तसेच युवक-युवतींचा सहभाग असून, देशभक्तीपर गीते, घोषणा आणि ''हम सेना के साथ हैं'', ''ऑपरेशन सिंदूर के साथ राष्ट्र'' असे बॅनर लावून देशभक्तीचा संदेश दिला जाणार आहे. पदयात्रेदरम्यान शहीद जवान स्मारकाला अभिवादन करत श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे.

# नगर-मनमाड महामार्गावर वाहतूक ठप्प

## रस्त्याचे काम सुरू; नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** शहरातील नगर - मनमाड महामार्गावर असलेल्या पुणतांबा चौफुली परिसरात सोमवारी दोन ते तीन तासांपासून मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. रस्त्याचे सुरू असलेले काम आणि लग्नसराईमुळे वाढलेली वाहनांची संख्या यामुळे संपूर्ण परिसरात वाहतूक ठप्प झाली होती.



वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली. विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या वाहतूक कोंडीमध्ये देखील कोणताही पोलीस बंदोबस्त अथवा वाहतूक नियंत्रणासाठी कर्मचारी उपस्थित नव्हता. यामुळे परिस्थिती आणखीनच बिकट झाली. सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने कोपरगाव शहर आणि परिसरातून विविध दिशांना जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याच दरम्यान पुणतांबा चौफुली परिसरात रस्त्याचे कामही सुरू असल्याने अरुंद झालेल्या मार्गावरून वाहने हळूहळू पुढे सरकत होती. परिणामी, महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहने अडकली.

या वाहतूक कोंडीमुळे कार्यालयात जाणारे कर्मचारी, विद्यार्थ्यांसह रुग्णवाहिकांनाही अडथळा निर्माण झाला. वेळेवर पोहोचण्याच्या घाईत असलेल्यांना मोठी अडचण निर्माण झाली. काही ठिकाणी नागरिकांनी आपल्या वाहनातून उतरून रस्त्यावरच मदत करण्याचा प्रयत्न केला, पण पोलीस बंदोबस्ताच्या अभावामुळे परिस्थिती सुधारली नाही.

▶ ''रस्त्याचे काम सुरू ठेवणे योग्य आहे, पण त्याचबरोबर पर्यायी मार्गाची व्यवस्था किंवा वाहतूक पोलीस तैनात करणे आवश्यक होते. आता दोन तास या ठिकाणी अडकून बसावे लागत आहे,'' अशी प्रतिक्रिया एका वाहनधारकाने दिली. वाहतूक कोंडी ही केवळ गैरसोयीची बाब नसून आपत्कालीन परिस्थितीत मोठा अडथळा ठरू शकते. प्रशासनाने यापुढे अशा वेळांना योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

# प्रा. डॉ. घुंगार्डे यांच्या संशोधनाला पेटंट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचालित पारनेर महाविद्यालयात भूगोल विभागात कार्यरत असणारे सहयोगी प्राध्यापक व महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे यांना नाविन्यपूर्ण उपकरणासाठी भारत सरकारच्या बौद्धिक संपदा कार्यालयाकडून पेटंट नुकतेच प्रदान करण्यात आले आहे.



या संशोधनामध्ये प्रा. डॉ. ज्योतिराम मोरे, प्रा. डॉ. अर्जुन डोके आणि डॉ. सुरिंदर वावळे यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले आहे. जमिनीच्या उंची व उतार मापनासाठी हे उपकरण उपयुक्त ठरणार असून, कृषी, भूगर्भशास्त्र तसेच जल व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये त्याचा प्रभावी वापर होणार असल्याचे डॉ. दत्तात्रय घुंगार्डे यांनी सांगितले.

डॉ. घुंगार्डे यांच्या यशाबद्दल नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे सर्व विश्वस्त व सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांनी अभिनंदन केले आहे.

### पाणी १४ दिवस सुरू राहणार

▶ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी संस्था काम करत आहे. महाविद्यालयात अध्ययन-अध्यापनासोबतच प्राध्यापक संशोधनाच्या क्षेत्रातही आपले योगदान देत आहेत. ही संस्थेच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.

**रामचंद्र दरे**
**अध्यक्ष,**
**नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर.**

## न्यू इंग्लिश स्कूलचा ९६. ८१ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** येथील नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पारनेर न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचा २०२५ मध्ये झालेल्या १० वी चा निकाल शेकडा ९६. ८१ टक्के लागला असून विद्यालयाने आपल्या यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

# फुले विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी:** सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कृषी विद्यापीठ राहुरी येथील इयत्ता १० वी च्या उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. २६३ विद्यार्थ्यांपैकी २५२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा निकाल ९५.८१ टक्के लागला. ९० टक्कयांपेक्षा पेक्षा जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी संख्या ३५ आहे.



१०० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य श्रेणी संपादन केली. विद्यालयात शिंदे काव्य मुकुंद ९६.४० टक्के गुण मिळवून प्रथम, शिंदे सई अरविंद ९६ टक्के गुण मिळवून द्वितीय, कुलकर्णी मंगेश विवेकानंद ९५.६० आणि ठाकूर प्रथमेश गोकुळ ९५.६०% गुण मिळवून तृतीय आले.

या घवघवीत यशाबद्दल सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. महानंद माने, खजिनदार महेश घाडगे, मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे व पर्यवेक्षक मनोज बावा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# दहावी परीक्षेत 'संजीवनी सैनिकी'चे यश

## विक्रम जगताप ९५. ६० टक्के गुण मिळवून सर्व प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेतलेल्या इ.१० वीच्या परीक्षांचे निकाल जाहिर केले असुन यांत संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी सैनिकी स्कूलने आपली १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.



यात विक्रम सुरेश जगताप याने ९५. ६० टक्के गुण मिळवून स्कूलमध्ये सर्व प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकाविला. निखिल वाल्मिक गायकवाडने ९४. ८० टक्के गुण मिळवून दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला. सोहम सुदिप देशमुखने ९३. ४० टक्के गुण मिळवून तिसऱ्या क्रमांकावर शिक्कामोर्तब केले. हितेश दादाजी पाटील व गणेश शरद कांगणे यांनी अनुक्रमे ९३. २० व ९२. ८० टक्के गुण मिळवून चौथा व पाचवा क्रमांक मिळविला. एकुण ५२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ४४ विद्यार्थ्यांनी ८० टक्यांपेक्षा अधिक गुण मिळवून आपल्या प्रतिभा संपन्नतेचे दर्शन घडविले, अशी माहिती स्कूलने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



संजीवनीचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, विश्वस्त श्री सुमित कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक, प्राचार्य कैलास दरेकर व सर्व शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

# भागवत कथेची हजारो भाविकांच्या उपस्थित सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील अंजनापूर येथे गेल्या ७ दिवसापासून श्री संत जगद्गुरु जनार्दन स्वामी समाधीस्थान बेट कोपरगावचे मठाधीपती महंत रमेशगिरीजी महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने लोकनेते मारुतीराव सखाराम गव्हाणे व बिजलाबाई गव्हाणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित श्रीमद् भागवत कथेची हजारो भाविक भक्तांच्या उपस्थित मोठ्या जल्लोषात सांगता झाली

हभप परमपूज्य देव गोपाल शास्त्री महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून सुरू असलेल्या श्रीमद् भागवत कथेची सांगता गोदावरी धाम सरला बेटचे मठाधिपती महंत हभप रामगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने व हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत सर्वांना महाप्रसादाचे वाटप करत मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाली.



या भागवत कथेस गोदावरी दूध संघाचे चेअरमन राजेश परजणे, शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास कोते, भाजपा तालुका अध्यक्ष कैलास राहाणे, सिने अभिनेते हंसराज जगताप, शिर्डीचे माजी नगरसेवक तुषार गोंदकर, माजी पंचायत समिती सदस्य बाळासाहेब राहाणे आदींनी भेटी दिल्या. अखेरच्या दिवशी मठाधिपती महंत रमेशगिरीजी महाराज,कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोकराव रोहमारे, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन औताडे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री शिरिष व वमने, कर्मवीर शंकरराव काळे साखर कारखान्याचे संचालक प्रवीण शिंदे, हभप शिवशाहीर विजय महाराज तनपुरे, अभिनेते सचिन गवळी, हभप मयूर महाराज पाचोरे, हभप चांगदेव महाराज ढेपे, हभप बबन महाराज गाडेकर, हभप भास्कर महाराज गव्हाणे आदी उपस्थित होते.

रामगिरीजी महाराज यांनी उपस्थितांना उपदेश करताना सांगितले की, भक्ती हा परा कोटीचा मार्ग आहे. ईश्वरीय साधना मनुष्याला मुक्तीचा मार्ग दाखवते हे प्रत्येकाला समजत असूनही त्याची आवड निर्माण होत नाही. त्यामुळे कलयुगात मनुष्याला दिवसेंदिवस समस्या वाढत आहे. त्यामुळे प्रत्येकाने धार्मिक कार्यात जास्तीत जास्त सहभाग नोंदवत परमात्म्याचे नामस्मरण करावे. कारण परमात्मा सदैव आपल्याला येणाऱ्या समस्या अडचणी सोडवण्यासाठी तयार असतो. त्याकरीता मनोभावे देवाची प्रार्थना करणे आवश्यक आहे.

▶ आयोजक आरोग्यदुत बाळासाहेब गव्हाणे यांनी सांगितले की, आजी-आजोबांच्या पुण्यस्मरणनिमित्त इतर काही खर्च करण्यापेक्षा सर्वांच्या सहमतीने भागवत कथेचे आयोजन केले. गेल्या ७ दिवस अखंड सुरू असलेल्या या भागवत कथेस मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहिले. या सर्वांना आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने दररोज अन्नदान करण्याची सेवा मिळाली. तसेच गेल्या दोन दिवसापासून कमी अधिक प्रमाणात अवकाळी पाऊस सुरू असताना देखील कथेसाठी येणाऱ्या भाविक भक्तांची कुठे कमी जाणवली नाही. दररोज आपल्याच गर्दीचा उच्चांक मोडत भागवत कथा आपल्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वी संपन्न झाली.

# नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करा

## १५ दिवसात मागण्या पूर्ण करा अन्यथा आंदोलन; नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना शिष्टमंडळाचे निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते तथा मा. महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध विकासाच्या योजना राबवून अत्यंत वैभवशाली व सुरक्षित शहर म्हणून संगमनेरची राज्यात ओळख निर्माण झाली आहे. मात्र मागील ३ वर्षापासून संगमनेर नगर परिषदेवर प्रशासक असून विकास कामांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने अनेक शहरातील नागरिक अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शहरांमध्ये नागरिकांचा रोष वाढत असून तातडीने या समस्या सोडवाव्यात या मागणीसाठी काँग्रेसने निवेदन दिले असून १५ दिवसात मागण्या न सोडवण्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

> अपंगांच्या निधी प्रलंबित आहे व अपंगांची संख्या वाढत चालली असून तो प्रश्न सोडवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. संगमनेर शहरात आपण सुंदर ४० गार्डन निर्माण केले आहेत. मात्र त्याची आता दुरावस्था झाली आहे आणि गार्डनमधील लहान मुलांचे खेळण्याची साहित्य मोडकळीस आले आहे. संगमनेर शहराची स्वच्छता आणि सौंदर्य बिघडवण्याचे काम सुरू आहे, ते थांबवले पाहिजे.
>
> **– दुर्गाताई तांबे, माजी नगराध्यक्षा**



संगमनेर नगरपरिषद येथे मा. नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी विश्वासराव मुर्तडक, सोमेश्वर दिवटे, गणेश मादास, निखिल पापडेजा, किशोर टोकसे, शैलेश कलंत्री, गजेंद्र अभंग, जीवन पंचारिया, अभय वाजे, शिद्राम दिड्डी, अरुण गावित्रे, मुस्ताक शेख, शेख अहमद, प्रकाश कडलक, मनोज कुमार गंगवाल, सुभाष सानप, ॲड. अशोक हजारे, सचिन खेमनर, अमित गुंजाळ, ॲड. सुहास आहेर, सुमित पवार, शशिकांत पवार, सतीश शिंदे, सुभाष दिघे, अंबादास आडेप, विशाल निळे आदी मान्यवर उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, पावसाळ्यापूर्वी शहरातील नाटकीनाला सह उपनद्या साफ कराव्यात, भुयारी गटारी योजनेचे काम तातडीने मार्गी लावावे, शहरातील उद्याने साफ करावीत व तेथे चालणारे अवैध धंदे व गैरवापर करणाऱ्यांचा बंदोबस्त करावा, ज्या स्ट्रीट लाईट बंद असतील त्या तातडीने चालू कराव्यात, विजेच्या तारांवर आलेल्या झाडांच्या फांद्या व वाढीव झाडांची कटिंग करावी, ज्या कामांच्या निविदा निघून वर्क ऑर्डर दिलेले आहेत ती कामे त्वरित चालू करावी, मोडकळीस आलेल्या इमारतींना पूर्व सूचना देऊन त्या काढून घ्याव्यात, म्हाळुंगी नदीच्या पुलाला पावसाळ्या अगोदर कठडे बसवावी, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे नगरपालिका प्रशासनाने पुढील पंधरा दिवसात या मागण्या पूर्ण कराव्यात, तातडीने कार्यवाही करावी, असे न झाल्यास काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# 'दहशत' हे माजी आमदारांचे वैफल्यातून विधान : आ. खताळ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यात गेली ४०वर्षापासून असणारी दहशत मोडून काढण्याचे काम सर्वसामान्य जनतेने केले आहे. आणि माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्याला या जनतेची सेवा करण्याची संधी दिली. त्या मुळे शहर व तालुक्यात वातावरण शांत झाले आहे. जर त्यांना ही दहशत वाटत असेल तर त्यांचे हे विधान वैफल्यातून केले असल्याची टीका आ. अमोल खताळ यांनी माध्यमांशी बोलताना केली.

संगमनेर येथील शासकीय विश्रामगृहावर आ. खताळ काही काळ थांबले होते. त्यावेळी विविध माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, मागील सहा महिन्यापासून गावागावात आणि शहरात वातावरण शांत झाले असून आता खऱ्या अर्थाने संगमनेरकर जनता मोकळा श्वास घेत आहे. मात्र आपल्या बगलबच्चांच्या मार्फत दोन गटामध्ये भांडणे लावून देत हाणामार्या घडवून आणत दहशत निर्माण करण्याचे काम सुरू होते.

परंतु, या तालुक्यातील मायबाप जनतेने माझ्यासारख्या एका सर्वसामान्य शेतकर्याच्या मुलाला या तालुक्याचे लोकप्रतिनिधित्व करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे संगमनेर शहर आणि तालुक्यातील वातावरण गेली सहा महिन्यापासून शांत झाले आहे. ही जर त्यांना ही दहशत वाटत असेल तर त्यांचे हे हास्यास्पद विधान असल्याची टीका आ. खताळ यांनी माजी मंत्री आणि माजी आमदारांचे नाव न घेता केली.

# कोल्हारच्या गुरूकुलचा १०० टक्के निकाल

## दिग्गज मान्यवरांकडून यशस्वी विद्यार्थ्यांवर कौतुकांचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : राहाता तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे, न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ (कला) महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा निकाल शंभर टक्के लागला व इयत्ता दहावीचा निकाल ८२.४१ टक्के लागला. इयत्ता दहावी गुरुकुलचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

इयत्ता बारावीमध्ये खरात चैताली हेमेंद्र ६८.८३ टक्के प्रथम क्रमांक, शेख आलिया अल्ताब ६६.६७ टक्के द्वितीय क्रमांक, हकीम सिफा अब्दुल मुख्तार ६६.१७ टक्के तृतीय क्रमांक व इयत्ता दहावीमध्ये जाधव श्लोक अण्णासाहेब ९३.४० टक्के गुण मिळवून प्रथम आला. मांडुळे गायत्री बापूसाहेब ९२.६० टक्के व कदम अथर्व संतोष ९२.६० टक्के गुण मिळवून द्वितीय आला. पुजारी तनिष्का सोपान ९१.८० टक्के गुण मिळवून तृतीया आली.

इयत्ता दहावीमध्ये १८२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ६६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले ३८ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले, अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य अंकुशराज जामदार यांनी दिली.

### यशस्वी विद्यार्थ्यांचे मान्यवरांकडून कौतुक

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील, स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील, जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के पाटील, सदस्य संतोष थेटे, अजीत मोरे, बी. के. खर्डे, अशोक आसावा, पांडूरंग देवकर, संजय शिंगवी, विभागीय अधिकारी बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी नाईकवाडी, मुख्याध्यापक अंकुशराज जामदार, उपमुख्याध्यापक सीताराम बोरूडे, पर्यवेक्षिका संजीवनी आंधळे तसेच सर्व शिक्षणप्रेमी, ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

















# सावता माळी पाणी वापर संस्थेची सभा खेळीमेळीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : श्री सावतामाळी पाणी वापर संस्था क्रमांक ४ श्रीगोंदाची संचालक मंडळाची सभा दि. ११ मे २०२५ रोजी खंडोबा मंदिर येथे संस्थेचे व्हा. चेअरमन बाळासाहेब खेतमाळीस यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे नऊ पैकी आठ संचालक उपस्थित असल्याने कोरम पुर्ण झाल्याने सभेच्या कामकाज सुरू करुन संस्थेचे सचिव शरद डाके यांनी प्रथम मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन केले त्यास सर्व सहमतीने त्यास मंजुर करण्यात आले.

यावेळी सभेपुढील विषयांवर साधक बाधक चर्चा करुन ज्या शेतकऱ्यांनी चारीवरुन केलेल्या पाइपलाइनमळे खराब झालेल्या चारीच्या साईड पटटयांवर मुरुम टाकुन घेणे, चारीवर ठाकलेल्या नळ्यांवर बांधकाम करणे, संस्थेच्या झालेल्या खर्चास मान्यता देणे, सभासदाकडील थकबाकी दि. ३० जून २५ अखेर जमा करणे व संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत संपत असल्याने २० जुलै २०२५ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा घेऊन नवीन कार्यकारिणीची सभासदांबरोबर चर्चा करुन बिनविरोध निवड करणे याविषयावर चर्चा करुन सर्वानुमते सर्व ठराव मंजूर करण्यात आले.

### थकबाकी दारांना भाग घेता येणार नाही

वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २० जुलै २०२५ रोजी खंडोबा मंदिर येथे होणाऱ्या सभेत थकबाकी असणाऱ्या सभासदास भाग घेता येणार नाही.तसेच संस्थेस किमान ३००० रुपयापेक्षा जास्त उत्पन्न देणाऱ्या सभासदासच कार्यकारिणीत संचालक होण्यास सहभागी होता येईल, असा ठराव करण्यात आला आहे.

### सभासदांनो, थकबाकी जमा करा


सर्व सभासदांनी ३० जून २०२५ पर्यंत आपली थकबाकी जमा करुन होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले.

# धनवटे बहिण-भावांचे दहावी-बारावीत गगनभरारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : नुकताच दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून त्यामध्ये माजी नगरसेवक स्व. अमोल धनवटे यांची कन्या पूर्वा अमोल धनवटे हिने ९६.८० टक्के गुण मिळवून तालुक्यात तृतीय क्रमांक मिळविला. तर माजी नगरसेवक आशिष धनवटे यांचे चिरंजीव समर्थ आशिष धनवटे याने ९५.२० टक्के गुण मिळवून विद्या निकेतन स्कूलमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. त्यामुळे या बहिण भावांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.





तालुक्यात दुसरा क्रमांक मिळवणारी पूर्वा धनवटे डी. डी. काचोळे विद्यालयाची विद्यार्थिनी असून अतिशय नम्र व हुशार विद्यार्थिनी असून तिने आतापर्यंत झालेल्या सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये जिल्हा पातळीवर अव्वल क्रमांक मिळवून यश मिळवलेले आहे. तिला एमपीएससी, यूपीएससीच्या परीक्षा देऊन उच्च पदावर जाण्याची इच्छा आहे.

तसेच समर्थ धनवटे हा विद्या निकेतन दहावी सीबीएससीचा विद्यार्थी असून तो सर्वगुण संपन्न विद्यार्थी आहे. त्यानेही आतापर्यंत जिल्हा पातळीवर विविध स्पर्धा विशेषत: व्हॉलीबॉलमध्ये नावलौकिक मिळवलेला आहे. त्यालाही आयआयटीमध्ये इंजिनिअरिंग क्षेत्रात जाण्याची इच्छा आहे.

या बहिण भावांनी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. त्यांना युनिव्हर्सल अकॅडमीचे शिक्षक सतीश थोरात, जयश्री थोरात यांच्यासह विद्यालयाचे शिक्षक शिक्षिका यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य मीनाताई जगधने, विद्या निकेतन संस्थेचे चेअरमन प्रा. टी. ई. शेळके व व्हा. चेअरमन डॉ. प्रेरणा शिंदे, डॉ. राजीव शिंदे, प्राचार्य वर्षा धामोरे, प्राचार्य सुनील साळवे आदींनी कौतुक केले आहे.

# बांधकामांसाठी नागरिकांना वाळू मिळेना?

## राहाता परिसरात बांधकामे ठप्प; नागरिक आले मेटाकुटीला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**साकुरी** : शासनाच्या नवीन वाळू धोरणामुळे सर्वसामान्य नागरीकणा वाळूचा तुटवडा जाणवू लागला आहे. नवीन व जुन्या बांधकामाचे काम करण्यासाठी सध्या नागरीकणा वाळू उपलब्ध होत नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक मेटकुटीला आले आहे.

यापूर्वी सहाशे रुपये प्रती ब्रासने सरकार वाळू उपलब्ध करून देत होते. परंतु मागील सात ते आठ महिन्यापासून नागरिकांना वाळूचा तुटवडा जाणवू लागला आहे. त्यामुळे परीसारमधील सर्व बांधकामे ठप्प झाली आहे.

तहसील कार्यालयामधून सुद्धा कुठलेही ठोस आश्वासन नागरीकांना मिळत नाही आहे. तहसील कार्यालयातून उडवउडवीची उत्तर नागरिकांना दिली जात आहे. त्यामुळे राहाता परिसरामधील नागरिक मेटकुटीला आले आहे.



चोरीच्या वाळूचा रेट प्रती ब्रास पाच हजार इतका पोहचला असून पाच हजार रुपये प्रती ब्रास पैसे देण्यास नागरिक तयार असून सुद्धा नागरिकांना वाळू मिळणे अवघड झाले आहे.

अनेक नागरिकांनी घर कामांसाठी वाळू मिळणे कामी तहसीलदार यांना अर्ज केले आहे. परंतु नागरीकांना कुठलेही ठोस आश्वासन तहसीलदार यांच्याकडून मिळत नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक यांच्यामध्ये नाराजी पसरली आहे.

# जिल्हा राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्षपदी ऋषीकेश शेलार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सुपा** : अहिल्यानगर जिल्हा जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी ऋषीकेश शेलार यांची निवड झाली आहे.

त्यांना निवडीचे पत्र, महाराष्ट्र राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, विधानपरिषदेचे आ. गर्जे, पक्षाचे राष्ट्रीय युवक अध्यक्ष धीरज शर्मा, महाराष्ट्र प्रदेश युवकचे अध्यक्ष सुरज चव्हाण, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अशोक सावंत यांचे हस्ते राष्ट्रवादी भवन येथे ऋषिकेश शेलार यांना देण्यात आले.

यावेळी लोकनेते आण्णासाहेब शेलार, ज्ञानदेव गवते, वामनभाऊ भदे, युवराज पवार, स्वप्नील घोडेकर, रामदास शेलार, भास्कर घोडेकर, बिपिन काळाने, सागर जगताप, नामदेव साळवे, गोपीनाथ खेत्रे, दिगंबर शेलार, निखील ओव्हळ, समीर पठाण, मयुर राऊत, निखील क्षीरसागर, स्वप्निल डाके व प्रमुख युवा कार्यकर्ते उपस्थित होते.




ऋषीकेश शेलार यांची निवड झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, माजी मंत्री छगन भुजबळ, महिला आयोग अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

> ऋषीकेश शेलार यांच्या निवडीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अहिल्यानगरमध्ये अधिक बळकट होईल व पक्षाची अधिक सभासद नोंदणी होऊन युवक अधिक पक्षाकडे जोडले जातील, असा विश्वास जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अशोक सावंत यांनी व्यक्त केला.

# मध्यप्रदेशाचे मंत्री विजय शाह यांच्या वादग्रस्त वक्तव्याचा पीपल्स हेल्पलाइनकडून निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतीय लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण खात्याचे मंत्री विजय शाह यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा पीपल्स हेल्पलाइनच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला आहे. तर या मंत्राचा ऑपरेशन दगड भेजा शेंदूर या प्रतीकात्मक संज्ञेद्वारे संतप्त प्रतिक्रिया नोंदवण्यात आली आहे.

लोकभज्ञाक तत्वज्ञानापासून दूर गेलेले नेतृत्व समाजासाठी घातक आहे. दगड भेजा म्हणजे जड, अचेतन व विवेकशून्य मन, तर शेंदूर हा सत्तेचा अयोग्य तिलक दर्शवतो. देशात अशा मंत्र्यांची मानसिकता समाजात दुफळी व खऱ्या देशभक्ती प्रेरित असलेल्या नागरिकांसाठी घातक आहे. या मंत्र्याच्या नेमणुकीवर टीका करुन, अशा व्यक्तींना नैतिकता, समज किंवा लोकाभिमुखतेचे भान नसतानाही सत्ता दिली जाते, ही लोकशाही मूल्यांची विटंबना असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

संबंधित मंत्री यांचे वर्तन हे लोकभद्र्यक मूल्यांशी सुसंगत नाही. त्यांच्या विधानातून स्त्रीद्वेष, अज्ञान आणि सामजिक असंवेदनशीलता झळकते. त्यांच्या म्हणण्यानुसार, हे मंत्री केवळ राजकीय समीकरणांमुळे सत्तेवर आले असून त्यांच्या नेतृत्वात लोकशक्ती, ज्ञानशीलता व नैतिक मूल्यांचा अभाव असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

मंत्री विजय शाह यांनी तात्काळ सार्वजनिक माफी मागावी आणि पदाचा राजीनामा द्यावा, मंत्रीपदाच्या नैतिक, मानसिक आणि लोकाभिमुख पात्रतेचे स्वतंत्र मूल्यांकन व्हावे, देशातील नेतृत्व हे लोकभज्ञाक शुद्धतेच्या निकषांवर निवडले जावे, कर्नल सोफिया कुरेशी यांच्यासारख्या राष्ट्रसेवकांचा सन्मान आणि संरक्षण ही शासनाची जबाबदारी मानावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# 'संजीवनी'च्या प्रतिभावंतांकडून निकालाची परंपरा कायम

## संजीवनी इंटरनॅशनल स्कूलचा आर्यन सीबीएसई परीक्षेत ९५ टक्के गुण मिळवुन प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रवारी २०२५ मध्ये घेतलेल्या इ. १० वीच्या परीक्षांचे निकाल जाहिर केले असुन यात शिर्डी येथिल संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या प्रतिभावंतानी स्कूलची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यात आर्यन नाकराने ९५ टक्के गुण मिळवुन आपल्या प्रतिभा संपन्नतेचे दर्शन घडवत स्कूलमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकाविला.

श्रुती भाऊराव गांगुर्डे ही ९४ टक्के गुण मिळवुन दुसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरली. जिया नरेश पारख हिने ९२ टक्के गुण मिळवुन तिसरा क्रमांक मिळविला. उत्कृष्ट निकालाने संजीवनी इंटरनॅशनल स्कूलने आपला शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा सिध्द केला आहे, असे संजीवनी इंटरनॅशनल स्कूलने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.







संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध खेळ, सांस्कृतिक, विज्ञान प्रदर्शन, तांत्रिक स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, अशा प्रत्येक बाबतीत बक्षिसे मिळवुन आपली आघाडी सिध्द केली आहे. आता शैक्षणिक गुणवत्तेमध्ये १०० टक्के निकाल देवुन स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे.


### दिग्गज मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, स्कूलच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक, प्रिंसिपल डायरेक्टर सुधा सुब्रमण्यम, प्राचार्या रिना रजपुत, हेड मिस्ट्रेस रेखा साळुंके, सर्व शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

# नायगाव हायस्कूलचा दहावीचा ८८ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय नायगाव शाळेचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शेकडा ८८ टक्के लागला. वैष्णवी दत्तात्रेय नवले या विद्यार्थिनीने ९०.८० टक्के गुण मिळवून नाऊर केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला. विद्यालयातून सायली सुशील कुमार गोरे ८७ टक्के मिळवून द्वितीय तर महेश संपत आहेर ८५.४० टक्के मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.



गावचे सरपंच रा. ना. राशिनकर, तंटामुक्ती अध्यक्ष सुनील लांडे, चंद्रसेन लांडे, गोरे बाबा, संपत लांडे, दत्तात्रय नवले, मुख्याध्यापक लहानु लबडे शिक्षक पंडित, इंगळे, मोरे, इनामदार, मुंतोडे, बडाख व शिक्षकेतर कर्मचारी फणसे मच्छिंद्र तसेच शाळा व्यवस्थापन समिती व नायगाव ग्रामस्थांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मूल्यांमुळे विद्यार्थी जीवन बनते संस्कारक्षम

## डॉ. संजय मालपाणी; १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा केला सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : मूल्यांमुळे विद्यार्थी जीवन संस्कारक्षम बनते. उत्तुंग यशप्राप्तीकरिता विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत, वेळेचा सदुपयोग, मनावर नियंत्रण ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्यातील सत्त्वशीलता, संकल्पशक्ती जागृत ठेवून आकर्षित करणाऱ्या विविध गोष्टींच्या आहारी न जाता त्याग आणि परिश्रमासारख्या महत्त्वपूर्ण मूल्यांचे पालन केल्याने जीवनात यश प्राप्त होते. आरोग्य, सातत्यपूर्ण अभयास आणि कौशल्ये आत्मसात केलेले विद्यार्थी जीवनाच्या प्रतिपादन शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी केले.

शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या बारावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य दिलीप सांगळे, प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र ढमक, पर्यवेक्षक प्रा. आप्पासाहेब गुंजाळ, संस्थेचे सीईओ रुपेश वालझाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड म्हणाले की, बारावी बोर्ड परीक्षेत महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली असून हा निकाल व्यवस्थापन मंडळ, प्रशासन, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी आणि पालक या सर्वांच्या सामुहिक प्रयत्नांचे फलित आहे. उपप्राचार्य डॉ. राजेंद्र दमक म्हणाले की श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयाचा बोर्ड परीक्षेचा निकाल हा केवळ संख्यात्मक नसून तो गुणात्मकही आहे.

### विषय प्राध्यापकांचाही केला गेला सत्कार

अकाउंट विषयाचे प्रा. आप्पासाहेब विटमे व प्रा. राजाराम चत्तर, मॅकेनिकल मेंटेनन्स विषयाचे प्रा. नवनाथ घुगे व प्रा. करुणा चाबुकस्वार, आय. टी. विषयाचे प्रा. रविंद्र कुडेकर यांचाही सत्कार करण्यात आला. प्रास्तविक प्रा. राजेंद्र ढमक, तर सूत्रसंचालन प्रा. संदीप वलवे यांनी केले. आभार प्रा. आप्पासाहेब गुंजाळ यांनी मानले.



शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयाने शैक्षणिक १२वी बोर्ड परीक्षेत सर्वोत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९९.७९ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९८.६२ टक्के, कला शाखेचा निकाल ९०.०५ टक्के लागला आहे. मॅकेनिकल मेन्टेनन्स विषयात श्रेयस लांडगे व ईश्वरी सुर्वे यांनी २०० पैकी २००, तर अकाउंट विषयात ईश्वरी चव्हाण व साई अधापुरे यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले. आय. टी.मध्ये ईश्वरी चव्हाण १०० पैकी १०० गुण मिळवून बोर्डात प्रथम आल्याने श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयाच्या नावलौकिकात मानाचा तुरा खोवला गेला.

# पाथर्डीत एक किलो गांजा पकडला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : शहरात स्थानिक गुन्हे शाखने कारवाई करत १ किलो ३५८ ग्रॅम गांजासह एक इसम अटक केला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सोमनाथ लक्ष्मण फतपुरे (वय ४८ रा. रामगिरबाबा टेकडी, कोरडगाव रोड, पाथर्डी) असे आहे. ही कारवाई १५ मे रोजी रात्री ८.१५ वाजण्याच्या सुमारास केली आहे.

या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात,पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अन्य अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होते. गोपनीय माहितीच्या आधारे फतपुरे याच्या राहत्या घरावर छापा टाकण्यात आला. या वेळी त्याच्या घरातील एका खोलीत लाल रंगाच्या पिशवीत गांजा (कॅनाबिस वनस्पतीचा भाग पाला, फुले, काड्या) आढळून आला. फतपुरे याने चौकशीत सदर अंमली पदार्थ गांजा असल्याची कबुली दिली असून तो नशेसाठी आणि विक्रीसाठी वापरत असल्याचे सांगितले. वजन केल्यानंतर हा गांजा १ किलो ३५८ ग्रॅम असल्याचे निष्पन्न झाले.

या गांजाची अंदाजे बाजार किंमत २७,१६० रुपये इतकी आहे. फतपुरे याच्यावर पोलीस कॉन्स्टेबल भगवान थोरात यांच्या फिर्यादीवरून कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीकडून गांजा कोठून आणला याबाबत माहिती मिळवण्यासाठी पोलीस अधिक तपास करत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या या कार्यवाहीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# अवैध गोवंश वाहतूक; ५ जणांवर गुन्हा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : शहराजवळ येवला रस्त्यावर सकाळी १० वाजता येवल्याकडे जाणाऱ्या आयशर टेम्पोमधील आरोपी विनोद रवींद्र माईंनकर, गोरख कदम, चव्हाण आदीसह पाच जणांविरुद्ध २१ अवैध गोवंश वाहतूक केल्याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत गोरक्षक मयुर विधाते यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, राज्यात गोवंश हत्या करण्यास बंदी असतानाही शहरात येवला नाका या ठिकाणी एक आयशर कंपनीचा टेम्पो (एम.एच. १८ बी.जी. ४४८९) हा गोवंश जातीची जनावरे दाटीवाटीने कोंबून, अन्न पाणी न देता बेकायदा घेऊन जाताना आढळून आला. त्यात ४० हजार रुपये किमतीच्या चार गायी, १० हजार रुपये किमतीची दोन वासरे, १५ हजार रुपये किमतीची काळे रंगाची दोन वासरे, ५ हजार रुपये किमतीचे एक तांबड्या रंगाचे वासरू, २० हजार रुपये किमतीचा तांबड्या रंगाचा शिंगे असलेला एक बैल, २ लाख रुपये किमतीचे दहा सफेद रंगाचे बैल (किंमत प्रत्येकी २० हजार) तसेच ३ लाख रुपये किमतीचा एक आयशर कंपनीचा टेम्पो असा एकूण ५ लाख ९० हजार रुपये किमतीचा ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे.



याप्रकरणी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हांडोरे करीत आहेत. सर्व २१ गोवंशांना कोकमठाण येथील गोकुळधाम गौरक्षा केंद्रात पुढील संगोपनासाठी पाठवण्यात आले.

# मुख्यमंत्री, उपमुख्यांविरोधात गुन्हा दाखल करावा

## शेतकरी संघटनेच्या राहुरी तालुका युवा आघाडीच्यावतीने मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती करण्याचे आश्वासन विधानसभा निवडणुकीत महायुतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले होते. त्यावर विश्वास ठेवून राज्यातील शेतकऱ्यांनी महायुतीच्या उमेदवारांना भरभरून मते दिली. तरी सरकार स्थापन झाल्यानंतर या राजकीय मंडळींना शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती विसर पडला आहे.

मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री कृषी मंत्री यांचेवर गुन्हे दाखल करा. त्यांनी कर्जमुक्तीचे जाहीरनाम्यात आमिष दाखवत शेतकऱ्यांचे सरसकट कर्जमुक्तीची शेतकऱ्यांची फसवणूक केली, अशी तक्रार शेतकरी संघटनेच्या राहुरी तालुका युवा आघाडी अध्यक्ष अमोल मोढे यांनी राहुरी तालुका पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्याकडे तक्रार दाखल केली. यावेळी अविनाश शेळके, वसंत शेटे, श्रीकांत दळे, अनिकेत पोटे, अशितोष मोरे, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते हजर होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजीत पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कृषी मंत्री माणिक कोकाटे यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करा. याबाबत पोलिस प्रशसनाने भूमिका न घेतल्यास आपण उच्च न्यायालयाच्या माध्यमातून शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ अजीत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही फिर्याद दाखल करण्याकामी न्यायालयात दाद मागणार आहोत. तशी तक्रार एस. पी. कार्यालय अहिल्यानगर जिल्हा येथे करणार आहोत. कारण शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारभूत किमंत मिळत नाही. राज्य शासनाने सत्तेत येण्या आधी उत्पादन खर्च अधिक २० टक्के नफा देऊ, अशी घोषणा केली. तरी अशी कुठलीही हालचाल शासनाकडून दिसत नाही. राज्यात दर दिवशी २०२४ मध्ये ८ ते ९ शेतकरी आत्महत्या करत होते. आता त्यात २०२५ मध्ये ३२ % वाढ झाली आहे. निवडणुकीच्या काळात शेती धंदा तोट्यात असल्याने शेतकरी कर्ज बाजारी होऊन आत्महत्या करत आहे. तक्रार अर्जामध्ये मोढे यांनी म्हटले आमच्या कुटुंबाचा पिढ्यान पिढ्या पासून शेती हाच व्यवसाय आहे. शेतीत आम्ही ऊस, कांदा व कापूस हंगामी पिके घेतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून नेसर्गिक अपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ तसेच वन्य प्रान्यामुळे शेतीतील पिकांचे होणारे नुकसान व सरकारचे शेतकरी विरोधी धोरनांमुळे शेती आणि शेतकरी अडचणीत सापडला आहे.

मात्र अशा परिस्थितीत आमच्या कडील सहकारी सोसायट्याचे कर्ज थकी गेले आहे. उदर निर्वाहच करण्यासाठी आधीच अर्धिक अडचण असताना या कर्जाचे हप्ते भरणे अशक्य झाले आहे. संस्थेने थकित कर्जावर सुमारे साडेअकरा टक्के व्यजाची आकारणी केल्याने आम्ही अडचणीत आलो आहे. कोरोना काळात चार वर्ष शेतीमाल हा कवडीमोल भाव विकला आणि आता देखील शेतीमालाला हवा तेवढा भाव मिळत नाही. यामुळे आम्ही आर्थिकदृष्ट्या अत्यंत अडचणीत आलो आहे म्हणून शेतकरी कर्ज भरू शकत नाही. असे तक्रार अर्जात म्हटले आहे.

# पेन्शनधारकांना लाभ देण्याचा प्रयत्न

## मनसुख मांडवीया यांचे खा. वाकचौरे यांना आश्वासन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव** : पेन्शनधारकांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे अश्वासन मनसुख मांडवीया यांनी खा. भाऊसाहेब वाकचौरे यांना दिले आहे.

देशातील लाखो 'इपीएस ९५' पेन्शनधारकांनी दहा ते १२ वर्षापासून पेन्शनवाढ न झाल्याने अनेक आंदोलने राष्ट्रीय संघर्ष समितीने केली. अनेक वेळा शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचे मार्फत तसेच अनेक खासदार मार्फत कामगार मंत्री, अर्थमंत्री तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन पेन्शनवाढीचा प्रश्न मांडला. खा भाऊसाहेब वाकचौरे यांनीही लोकसभेत प्रश्न उपस्थित केले. केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीया यांचेकडे सतत पाठपुरावा करून भेटी घेतल्या.

यास यश येउन कामगार मंत्री यांनी खा. वाकचौरे यांना पत्राने सकारात्मक आश्वासन दिले व त्यात नमूद केले की, कर्मचारी पेन्शन योजना १९९५ ही १६ नोव्हेंबरपासुन् लागू झाली. तिच्या अमलबजावणीनंतर जुनी कर्मचारी कुटुंब पेन्शन योजना १९७१ रद्द करण्यात आली. जुन्या योजनेतील सर्व दायीत्वे हस्तांतरित करण्यात आली. कर्मचारी पेन्शन निधीमध्ये समाविष्ट करण्यात आली.जुन्या योजनेतील लाभार्थ्यांना उपलब्ध असलेल फायदे व हक्क नवीन पेन्शन योजना अंतर्गत संरक्षित आणि चालू ठेवले आहेत. इपीएस ९५ योजना आश्वासित योगदाना, खात्रीशीर लाभ या विमांकीय तत्वावर आधारित आहे.




या योजनेचा उद्देश सदस्यांना आणि त्याच्या कुटुंबियांना वृद्धापकाळात जगण्याच्या लाभासाठी आर्थिक मदत प्रदान करणे आहे. हि योजना मासिक भविष्य निर्वाह निधी योगदानातील मालकाचा हिस्सा मासिक मासिक वेतनाच्या ८.३३ टक्केच्या समतुल्य रकमेवर रुपांतरीत करून व केंद्र सरकारकडून मासिक वेतनाच्या १.१६ टक्के दराने योगदान देऊन फक्त रु १५००० च्या वेतनावर देय रकमेपर्यंत मर्यादितनिधी दिला जातो. ही योजना एक मर्यादित वित्त योजना आहे म्हणून योजनेत देय योगदानाचा दर व पात्र लाभाचे प्रमाण देखील निर्धारित केले आहे. आपण उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे मी कौतुक करतो व हे कळवू इच्छितो की, सरकार इपीएस ९५ योजना अंतर्गत कामगारांना जास्तीत जास्त लाभ मिळावा, यासाठी मी प्रयत्न करीत आहे.

या सकारात्मक पत्रामुळे राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोकराव राउत, प. भारत संघटक सुभाष पोखरकर, देवीसिंगअन्ना जाधव, संपत समिंदर, भगवंत वाळके आदी जिल्ह्यातील पदाधिकारी यांनी खा. भाऊसाहेब वाकचौरे यांना धन्यवाद दिले आहेत.

# शिरापूरच्या कन्येची पोलीस दलात भरारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : शिरापूर गावचे माजी सरपंच भाऊसाहेब किसन खोमणे यांची पुतणी व बैलांचे प्रसिद्ध व्यापारी ज्ञानेश्वर खोमणे यांची कन्या वैष्णवी जयश्री ज्ञानेश्वर खोमणे हिची पुणे कारागृह पोलीस दलात प्रथम क्रमांकाने निवड झाल्याबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.



जयश्री खोमणे हीने मैदानी चाचणी ५० पैकी ५० गुण मिळवत यश प्राप्त केले. गतवर्षीपासून जांबुत येथील जीनियस करिअर अकॅडमीत सराव सुरू केला व पहिल्याच वर्षी घवघवीत यश संपादन केले.

यासाठी मार्गदर्शक शिक्षक थोरात, चोरे, गावडे व आई वडील भाऊ विराज खोमणे यांचे मार्गदर्शन लाभले.

# आई-वडिलांची सेवा ही चारधाम यात्रेपेक्षा श्रेष्ठ : समाधान महाराज शर्मा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : गंगापूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात सुरु असलेल्या शिवमहापुराण कथेस भाविकांचा उदंड प्रतिसाद लाभत आहे. या धार्मिक उत्सवाच्या दुसऱ्या पुष्पात प्रसिद्ध कथाकार समाधान महाराज शर्मा यांनी आई-वडिलांची सेवा ही चारधाम यात्रा केल्यापेक्षा श्रेष्ठ असल्याचे मौलिक विचार व्यक्त केले.

पाच हजारांहून अधिक भाविकांच्या उपस्थितीत समाधान महाराजांनी सांगितले की, 'घरातील वयोवृद्ध माणसे सदैव हसतमुख राहावीत, ही त्या घराची खरी श्रीमंती असते. शिवमहापुराण केवळ एक ग्रंथ नसून, मानवी जीवनमूल्यांचे अधिष्ठान असलेले तत्वज्ञान आहे. ज्या घरात आई-वडिलांचा सन्मान राखला जात नाही, तिथे कितीही धार्मिक यात्रा केल्या तरी त्या निष्फळ ठरतात.'



या वेळी मंचावर आयोजक संजय जाधव, माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष रामेश्वर मुंदडा, कारखान्याचे संचालक दिलीप बनकर, गिरिजानाथ महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. समाधान महाराज पुढे म्हणाले, "कुटुंबात वागताना पाण्यासारखं वागावं, पिठासारखं नाही. पीठ काढल्यावर खड्डा पडतो, पण पाणी समसमान राहते. महादेवाकडे श्रद्धा, प्रेम आणि भक्ती असेल तरच भक्ताला महादेव प्राप्त होतो."

यावेळी रामेश्वर मुंदडा आणि राजेंद्र सरोवर यांच्या हस्ते सपत्नीक आरती करण्यात आली.कार्यक्रमात संतोष अंबिलवादे, गोपाळ राऊत, रामेश्वर नावंदर, अविनाश सोनवणे, तुकाराम सटाले, सुरेश नेमाडे, अशोक खाजेकर, सोपान देशमुख, जयेश निरफळ, सचिन मालपाणी, रमाकांत बनसोड, योगेश पाटील, अमोल वरकड, बाबासाहेब लगड यांच्यासह परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थिती लावली.

### महाप्रसादाचे चोख नियोजन

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. एकाच वेळी पाच हजारांपेक्षा अधिक भाविकांना पंगतीमध्ये बसवून महाप्रसाद देण्यासाठी पाच ट्रॅक्टर्स व शहरातील विविध सामाजिक संस्थांचे युवक कार्यकर्ते यांनी एकत्र येत गट-तट विसरून सेवा कार्यात सहभाग घेतला. या सेवाभावाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# याहीवर्षी अगस्तीचेच विद्यार्थी तालुक्यात प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीच्या सर्वच विद्यालयाच्या एस एस सी परीक्षा २०२५ चा निकाल अतिशय दिमाखदार लागला असून उज्वल यशाची आपली परंपरा कायम राखत तालुक्यात पहिल्या दोन्हीही विद्यार्थीनी अगस्तीच्याच चमकल्या असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

संस्थेच्या महात्मा फुले विद्यालय सुगाव बु ची विद्यार्थीनी कु गायत्री महेंद्र देशमुख हिने ९८.६० गुण मिळवत तालुक्यात प्रथम तर सह्याद्री विद्यालय ब्राम्हणवाडाची तनुजा राजेश फापाळे हिने ९६.२० गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला.

संस्थेचे संस्थापक गुरुवर्य बा ह नाईकवाडी तथा बाबा यांनी सातत्याने संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबविले व त्यानंतर दिवंगत संस्थेच्या सेक्रेटरी दुर्गाबाई नाईकवाडी तथा आई यांनीही संस्थेच्या गुणवत्तेसाठी कायम प्रयत्न केले व आजही त्यांच्या पश्चात संस्थेचे सर्व पदाधिकारी अत्यंत काटेकोरपणे गुणात्मक वाढीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवून ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेत टिकून राहावा, यासाठी प्रयत्नशील आहेत.

संस्थेच्या अगस्ति विद्यालयाचा निकाल ९६.५२ इतका असून विशेष प्राविण्य प्राप्त तब्बल १११ विद्यार्थी व प्रथम श्रेणीत ८१, द्वितीय श्रेणी ५३ विद्यार्थी विद्यालयात झळकले. तसेच विद्यालयात प्रथम येण्याचा मान सुयश रविंद्र लकारे ९४.६०, द्वितीय साइराज बाळासाहेब नवले ९४.२०, तृतीय क्रमांक आर्या पंडित देशमुख ९३.६० गुण प्राप्त केले.

संस्थेच्या सह्याद्री विद्यालय ब्राह्मणवाडा विद्यालयाचा निकाल ९८.०५ इतका लागला असून विद्यालयात अनुक्रमे प्रथम तनुजा राजेश फापाळे ९६.२०, द्वितीय सायली मंगेश गायकर ९४, तृतीय खाटेघरे निकिता खंडू ९२.२० गुण मिळवले तर आढळा विद्यालय देवठाणचा निकाल ९७.६२ इतका लागला असून विद्यालयात अनुक्रमे प्रथम आदित्य अमित शेळके ९४, द्वितीय प्रज्वल सूर्यभान काकड व आदित्य नारायण नेहे ९३, तृतीय साहिल सोमनाथ काळे ९२.२० गुण प्राप्त झाले व महात्मा फुले विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून अनुक्रमे गायत्री महेंद्र देशमुख ९८.६०, द्वितीय संस्कृती सुनिल वाकचौरे ९५.८० , तृतीय श्रुती ज्ञानेश्वर शिंदे ९५.२० गुण प्राप्त केले आहे.

कळसेश्वर विद्यालय कळस बु. विद्यालयाचा निकाल १०० लागला असून विद्यालयात प्रथम अमन इकबाल सय्यद ९४.२०, द्वितीय आदिती भानुदास चौधरी ९२.८०, तृतीय अदिती प्रविण वाकचौरे, श्रध्दा माधव कोल्हाळ ८९, ४० गुण. संत साईबाबा विद्यालय पिसेवाडी विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला असून विद्यालयात अनुक्रमे प्रथम वैष्णवी सुनिल हांडे ८९.४०, द्वितीय चैताली धोंडिभाऊ धराडे ८७.८०, तृतीय गायत्री गोरक्ष हांडे ८४.२० गुण प्राप्त केले. तर स्वामी विवेकानंद विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून अनुक्रमे प्रथम वैष्णवी दीपक देशमुख ९१.८०, द्वितीय वैष्णवी ललित वाकचौरे ८९.४०, तृतीय ईश्वरी संजय कानवडे ८८.४० गुण प्राप्त केले.

अगस्ति एज्युकेशन संस्थेने कायम विद्यार्थी गुणवत्ता केंद्रित मानून आपले अव्वल स्थान निर्माण केले आहे. या उत्तम यशाबद्दल संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, अध्यक्ष माधुरी वाकचौरे, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, पंचायत समिती शिक्षण विभाग, संस्थेच्या सर्व शाळांचे शालेय व्यवस्थापन समिती, माता-पालक संघ, शालेय समिती, पालक, सर्व परीसरातील ग्रामस्थ, संस्थेच्या सर्व विद्यालयातील प्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# महिला ग्रामसंघाची वार्षिक सभा खेळीमेळीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव** : हरिगाव येथे साईदीप महिला ग्रामसंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी अत्यंत खेळीमेळीत संपन्न झाली. यावेळी प्रमुख अतिथी तालुका व्यवस्थापक किरण शेरे, ग्रामसेवक प्रदीप आसने, ग्रा. पं. सदस्य अतुल भालेराव, सुनील शिणगारे, दीपक नवगिरे, पत्रकार चेडे, राहुल वाघ, समाधान वाहूळ आदी उपस्थित होते. ग्रामसंघ पदाधिकारी जोत्स्ना पंडित,भावना शिंगरे उषा भालेराव, सीआरपी सरिता वाहूळ, सारिका मोहन, कोमल मुठे, सुरेखा घोडके, संगीता त्रिभुवन, आश्विनी त्रिभुवन, वैशाली शिरसाठ आदी ३००महिला उपस्थित होत्या. यावेळी प्रास्तविक व पाहुण्यांचे स्वागत सरिता वाहूळ यांनी केले. ग्रामसंघाच्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्या महिलांचा एक साडी व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

वार्षिक जमा खर्च अहवाल सादर करण्यात आला. भविष्यात यापेक्षाही महिलांची प्रगती करण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामसेवक प्रदीप आसने व तालुका व्यवस्थापक बी. एम. शेरे यांनी व्यवसायाची, कर्जाची व नवीन योजनांची सविस्तर माहिती दिली.

# श्रीगुरुचरित्रातील अमृतबिंदू ग्रंथाचे प्रकाशन संपन्न

अहिल्यानगर - अहिल्यानगर येथील सावेडी उपनगरात स्टेट बँक कॉलनीमधील रहिवासी असलेले इंग्रजी कवी आणि लेखक दत्तप्रसाद अनिल थिटे यांच्या श्रीगुरुचरित्रातील अमृतबिंदू या तत्वज्ञानविषयक दीर्घ ग्रंथाचे प्रकाशन दिल्ली येथील राईटर्सग्रॅम या प्रकाशनसंस्थेत नुकतेच पार पडले. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे गुरुचरित्राच्या मनन आणि चिंतनातून स्फुरलेली सुमारे ८०० निरनिराळी तत्वं आहेत.

# निरामय

## स्तनाच्या कर्करोगामुळे...

स्तनाचा कर्करोग हा आता कर्करोगाचा सर्वात सामान्य प्रकार आहे. आता तरुणींमध्येही स्तनाचा कर्करोग दिसून येत आहे. तीस आणि चाळीशीच्या महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे निदान वाढत असल्याते निर्दशनास आले आहे. अनुवांशिकता, जीवनशैली आणि पर्यावरणीय घटकदेखील यामागे कारणे असू शकतात. या आजारामुळे २०४० पर्यंत दरवर्षी एक लाखांहून महिलांचा मृत्यू होण्याची शक्यता आहे. 'लॅन्सेट'च्या नव्या अहवालातून ही बाबसमोर आली आहे. अहवालात म्हटले, की २०२३ च्या अखेरीस सुमारे ७८ लाख महिलांना स्तनाच्या कर्करोगाचे निदान झाले आणि त्या वर्षी सुमारे सहा लाख ८५ हजार महिलांचा या आजाराने मृत्यू झाला. खेरीज या आजारावरील उपचारही अत्यंत महाग असल्यामुळे सर्व स्तरातील महिलांना वेळेत आणि योग्य ती मदत मिळत नाही. विशेषत: अविकसित भागांमधील वा काही विकसनशील देशांमध्येही ही स्थिती पहायला मिळते.



जागतिक स्तरावरील अंदाजानुसार स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण २०२० मध्ये २.३ दशलक्ष वरून २०४० पर्यंत तीन दशलक्षांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे, ज्याचा परिणाम कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांवर होईल. २०४० पर्यंत, दरवर्षी एक दशलक्ष लोकांचा मृत्यू होण्याची शक्यता आहे, असा इशारा 'लॅन्सेट' अहवालात दिला असून स्तनाच्या कर्करोगामुळे उद्भवणारी तीव्र असमानता आणि लक्षणे, नैराश्य आणि आर्थिक भार याकडे लक्ष वेधले आहे. दरम्यान स्तनाच्या कर्करोगामध्ये अशी काही लक्षणे आहेत जी स्तनामध्ये गाठ निर्माण होण्यापूर्वी दिसतात.

आरोग्यचर्चा

'ओहायो स्टेट युनिव्हर्सिटी कॉम्प्रिहेन्सिव्ह कॅन्सर सेंटर'ने केलेल्या अभ्यासात एक हजाराहून अधिक लोकांचे सर्वेक्षण केले गेले आणि ९३ टक्के लोकांना स्तनाच्या कर्करोगाचे लक्षण म्हणून गाठ असल्याचे आढळले. सर्वेक्षण केलेल्यांपैकी निम्म्या व्यक्तींमध्ये थकव्याव्यतिरिक्त सामान्य लक्षणे आढळून आली. स्तनाच्या कर्करोगाची सुरुवात केवळ स्तनामध्ये गाठ निर्माण होण्याने होत नाही. स्तनाग्र (निप्पल) मागच्या बाजूने दबलेली, उलटे किंवा खालच्या दिशेने वळल्यास हा धोका लक्षात घ्यावा. स्तन आकुंचन होणे, स्तनाच्या भागामध्ये संवेदना कमी होणे, स्तनाची त्वचा मंद होणे, जाड होणे, स्तनाग्रा (निपल) मधून स्राव होणे आदी स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे आहेत. जगभरात गेल्या पाच वर्षांत स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांची संख्या प्रचंड वाढते आहे.

---

**रात्रभर झोपूनही दिवसा झोपावे वाटते. कितीही तास झोपले, तरी झोप कधीच पूर्ण होत नाही. सतत झोपणारी ही व्यक्ती आळशी आहे, असे तुम्हाला वाटते का? सत्य हे आहे की हा आळस नसून एक दुर्मीळ झोपेचा विकार आहे. ही एक गंभीर आरोग्य स्थिती आहे.**



## जास्त झोप हे आजाराचे लक्षण

अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिना येथील २६ वर्षीय मॉडेल ॲलिसा डेव्हिस हिलाही असाच झोपेचा विकार होता. ती १२ ते १४ तास झोपायची; पण तिचा आळस काही जात नव्हता. याबाबत डॉक्टरांचा सल्ला घेतला असता डॉक्टरांनी तिला जास्त पाणी आणि कॉफी पिण्याचा सल्ला दिला; पण तरीही झोप काही गेली नाही. सर्वांनी तिला आळशी मानले आणि ती स्वत:ला ही तशीच समजू लागली. परिस्थिती अत्यंत गंभीर झाल्यावर न्यूरोलॉजी तज्ज्ञ आणि झोप तज्ज्ञ डॉक्टरांनी तिची तपासणी केली. तिच्या स्थितीचे कारण इडिओपॅथिक हायपरसोमनिया नावाचा आजार असल्याचे आढळून आले. हा एक दुर्मीळ झोपेचा विकार आहे.

आरोग्यचर्चा

हा एक दुर्मीळ झोपेचा विकार आहे. यामध्ये सतत थकवा जाणवतो आणि रात्रभर झोप झाल्यानंतर तुम्ही जेव्हा उठता तेव्हा तुम्हाला पुन्हा झोपल्यासारखे वाटते. 'हायपरसोमनिया'ने ग्रस्त व्यक्ती इतक्या लवकर झोपी जाते की तिला त्याच क्षणी काही मिनिटे ते काही तास झोपावे लागते. या झोपेमागील कारण झोपेची कमतरता किंवा मानसिक आरोग्याची कोणतीही स्थिती नाही. साधारणपणे, पौगंडावस्थेच्या शेवटच्या वर्षांत किंवा प्रौढत्वाच्या सुरुवातीच्या वर्षांत ही समस्या उद्भवू शकते. लोक जास्त झोपेचा संबंध आळशीपणाशी जोडतात आणि आरोग्याची स्थिती म्हणून न पाहता, हे ओळखण्यासाठी कित्येक आठवडे किंवा महिने लागतात.

या आजाराने ग्रस्त लोकांची नेमकी संख्या निश्चित करणे कठीण असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. 'नॅशनल स्लीप फाऊंडेशन'नुसार, दर दहा लाख लोकांपैकी २० ते ५० लोक या झोपेच्या विकाराने ग्रस्त आहेत. दिल्लीचे वरिष्ठ फिजिशियन डॉ. बॉबी दिवाण यांच्या मते, या झोपेचा विकार समजून घेण्यासाठी आणि त्यावर उपचार करण्यासाठी वैद्यकीय शास्त्राला अजूनही खूप संशोधन करावे लागेल.

'इडिओपॅथिक हायपरसोमनिया'चे त्याचे सर्वात सामान्य लक्षण म्हणजे दिवसा जास्त झोप येणे. ही झोप इतकी जोरदार येते की माणसाला झोप घेतल्याशिवाय राहणे जवळजवळ अशक्य होते. एखाद्या व्यक्तीने डुलकी घेतली तर ती काही मिनिटांऐवजी काही तास टिकते. बहुतेक रुग्णांची अशी तक्रार असते की, झोप घेतल्यानंतरही त्यांना ताजेतवाने वाटत नाही आणि सतत थकवा आणि आळस येतो. या स्लीप डिसऑर्डरने ग्रस्त असणारे लोक २४ तासांत १२ ते १४ तास झोपतात. 'स्लीप फाऊंडेशन'च्या मते, 'इडिओपॅथिक हायपरसोमनिया'ने ग्रस्त असलेल्या ३५ ते ७० टक्के लोकांना स्लीप इनर्शियाचा अनुभव येतो. स्लीप इनर्शियात जागे झाल्यानंतरही व्यक्तीला चिंताग्रस्त आणि गोंधळलेले वाटते. याशिवाय या आजाराने ग्रस्त असलेल्यांना इतरही काही लक्षणे दिसू शकतात. 'स्लीप डिसऑर्डर'मागील नेमकी कारणे अद्याप कळू शकलेली नाहीत; परंतु अभ्यासात खालीलपैकी काही कारणे समोर आली आहेत. 'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासानुसार, 'इडिओपॅथिक हायपरसोमनिया'ने ग्रस्त असलेल्या पन्नास टक्क्यांहून अधिक लोकांना त्यांच्या कौटुंबिक इतिहासात झोपेचा विकार किंवा तत्सम मध्यवर्ती विकार आहे. यामागे जेनेटिक्स हे सर्वात मोठे कारण असल्याचा निष्कर्षही समोर आला आहे.

---

## इअरफोन वापरताय? सावधान!

मोबाईलवर सतत बोलण्यासाठी, गाणी ऐकण्यासाठी, चित्रपट पाहण्यासाठी किंवा वेबसिरीज पाहण्यासाठी आपण सतत ब्लू टूथचा वापर करतोच. आजच्या युगात ब्लूटूथ इअरफोन आणि इअरबडचा वापर सर्रास केला जातो. अनेकजण ऑफिसमध्ये किंवा प्रवासात असताना दिवसभर ब्लूटूथ इअरफोन वापरतात; पण ब्लूटूथ इअरफोनचा अतिवापर केल्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात.

ब्लू-टूथ इअरफोन, हेडफोन, इअरबड्सच्या माध्यमातून गाणी ऐकण्याची फॅशन वाढत आहे. तसेच दोन्ही हात मोकळे राहत असल्याने त्यांचा उपयोग फक्त हाक मारण्यासाठी व बोलण्यासाठी केला जातो. ब्लू टूथ वायरलेसचा हा वापर कनेक्टिव्हिटी या सुविधेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. दोन डिव्हाईसमध्ये जोडणीसाठी याचा वापर जास्त प्रमाणात होतो. स्मार्टफोन, टीव्ही, होम थिएटर हेडफोन यांसह अनेक उपकरणांसाठी ब्लू टूथचा वापर केला जाऊ शकतो; मात्र याच ब्लू टूथमुळे मोबाईलच्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक लहरी एकाग्र होतात आणि परिणामी कानाचा त्रास, डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, स्टॅमिना कमी होणे असे दुष्परिणाम दिसून येतात, असा निष्कर्ष तज्ज्ञ डॉक्टरांनी काढला आहे.

आरोग्य जागृती





जगात कुठेही असो पण अनेकांकडे वायरलेस इअरफोन असतात; परंतु वायरलेस इअरफोनमधून उत्सर्जित होणारी रेडिओ फ्रिक्वेन्सी रेडिएशन आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असतात.


'युनिव्हर्सिटी ऑफ कोलोरॅडो'च्या जेरी फिलिप्स यांनी या विषयावर संशोधन केले असून त्यामधून धक्कादायक माहिती समोर आली. दीर्घकाळ गाणी ऐकल्याने स्मरणशक्ती कमी होण्याची भीती असते. वायरलेस हेडफोन्स, इअरफोन्स, इअरबड्स आदींचा जास्त काळ वापर केल्यास त्यामधून बाहेर पडणारी रेडिओ फ्रिक्वेन्सी रेडिएशन्स आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन्स आरोग्याला हानी पोहोचवू शकतात.

---

## साखरेचं सेवन; मधुमेहाला कारण

मधुमेह आणि साखरेचा जवळचा संबंध आहे. मधुमेहाला अनेक बाबी कारणीभूत असतात. त्यामुळे सर्वांगिण आहार, जीवनशैली, जनुकं याबरोबर मधुमेहाबाबतीतली साखरेची भूमिका माहीत असायला हवी. रक्तातलं साखरेचं प्रमाण नियंत्रित करण्यात शरीर असमर्थ ठरू लागलं की मधुमेहाचं निदान होतं. स्वादुपिंडातून पुरेशा प्रमाणात इन्शुलिनची निर्मिती होत नसेल तर किंवा शरीरातल्या पेशी इन्शुलिनचा प्रतिकार करू लागल्या तर मधुमेह जडतो. यापैकी एक किंवा दोन्ही कारणं मधुमेहाला कारणीभूत ठरू शकतात. रक्तातल्या साखरेच्या अतिप्रमाणामुळे हृदयविकार, किडनी निकामी होणं असे धोके वाढतात. टाईप वन आणि टाईप २ असे मधुमेहाचे दोन प्रकार आहेत. टाईप १ मधुमेह अत्यंत दुर्मीळ आहे. या मधुमेहाचा संबंध जनुकांशी असतो तसंच मधुमेहाच्या एकूण रूग्णांपैकी ५ ते १० टक्के रूग्णांना टाईप १ मधुमेह असतो. उर्वरित टाईप २ मधुमेहाचे रूग्ण असतात.

साखर म्हणजे सुक्रोज. ही साखर ऊसापासून बनवली जाते. ग्लुकोज आणि फ्रुक्टोजच्या एकत्रिकरणातून सुक्रोज बनतं. आपण सुक्रोज खातो तेव्हा रक्तपेशींमध्ये शोषलं जाण्याआधी लहान आतड्यातल्या काही घटकांमुळे ग्लुकोज आणि फ्रुक्टोज हे घटक वेगळे होतात. यामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण वाढतं आणि स्वादुपिंडाला इन्शुलिनची निर्मिती करण्याचा संदेश मिळतो. इन्शुलिनमुळे ग्लुकोज रक्तातून बाहेर पडतं आणि त्याचा वापर ऊर्जेसाठी होतो. दरम्यान, पेशींकडून थोड्या प्रमाणात फ्रुक्टोजही शोषलं जातं आणि ऊर्जेसाठी वापरलं जातं. उर्वरित फ्रुक्टोज यकृतात शोषलं जाऊन त्याचं रूपांतर ग्लुकोजमध्ये किंवा चरबीत होतं. ही चरबी शरीरात साठून राहते तर ग्लुकोजचा वापर ऊर्जेसाठी केला जातो. फ्रुक्टोजचं रूपांतर चरबीत होत असल्याने त्याचं अतिप्रमाण ट्रायग्लिसराइड्सचं प्रमाण वाढवू शकतं. यामुळे हृदयविकार तसंच फॅटी लिव्हरचा धोका वाढतो. शरीरात ऊर्जा निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या साखरेपेक्षा अधिक साखर खाल्ली तर त्याचं रूपांतर फॅटी ॲसिड्समध्ये होतं आणि ती चरबी म्हणून साठवली जाते.




आरोग्यभान

साखरेच्या अतिसेवनामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. नियमितपणे गोड पेयांचं सेवन करणाऱ्या लोकांमध्ये मधुमेहाचा धोका २५ टक्क्यांनी वाढतो. दिवसभरात एखादं गोड पेय प्यायलं तरी मधुमेहाचा धोका १३ टक्क्यांनी वाढू शकतो. साखरेचं सेवन हे मधुमेहाचं कारण नसलं तरी त्याचा या विकाराशी खूप जवळचा संबंध असल्याचं उघड झालं आहे.

---

## हे उपाय येतील कामी

माझ्या चौदा वर्षांच्या मुलीला उजव्या कानाजवळ डोक्याला दुखापत झाली होती. प्राथमिक उपचारांनंतर ती बरी झाली. पण नंतर तिला चेहऱ्याच्या उजव्या बाजूला फेशियल पाल्सी झाला. यावर काय उपचार करता येतील?



उत्तर: फेशियल पाल्सी नुकताच झाला असल्याने औषधोपचार, व्यायाम आणि प्रतिबंधात्मक उपायांनी तुमची मुलगी बरी होऊ शकते. चेहऱ्याची उजवी बाजू थंड गोष्टींच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यायला हवी. उचव्या बाजूनी चुइंगम चघळणं उपयुक्त ठरू शकेल. गाल फुगवण्याचा व्यायाम केल्याने ओठ आणि गाल आधीच्या स्थितीत येतील.


विचारा प्रश्न

उजव्या बाजूच्या ओठांच्या कोपऱ्यापासून कानांपर्यंत नियमित मसाज करायला हवा. दिवसातून दोन ते तीन वेळा केलेला मसाज उपयुक्त ठरू शकतो. बहुसंख्य रूग्ण यातून पूर्णपणे बरे होतात. तरूण मुलं जलद गतीने बरी होतात.

---

## स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरविषयी...

मध्यंतरी काही कलाकारांना कॅन्सरचं निदान झालं. यामुळे बॉलिवूडसह त्यांचे चाहतेही चांगलेच हादरले. अर्थात त्यांच्या तब्येती चांगल्या असून ते उपचारांना प्रतिसाद देत असल्याच्या बातमीमुळे चाहत्यांना दिलासा मिळाला. या धक्क्यातून बॉलिवूड आत्ता कुठे सावरले खरे पण अशा बातम्या आता काही नव्या राहिलेल्या नाहीत. कॅन्सर हा दुर्धर आजार असल्याचं आपण जाणतो. रूग्णाच्या शरीरावर आणि मनावर या विकाराचे वाईट परिणाम होतात. पण उपचारांनी स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर बरा होतो. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर म्हणजे नेमकं काय याविषयी...




कॅन्सरचे विविध टप्पे असतात. कॅन्सर शरीरात किती खोलवर पसरला आहे यावरून त्याचा टप्पा ठरवला जातो. कॅन्सरच्या पेशींच्या वाढीची गती तसंच त्याचे धोके जाणून घेण्यासाठीही या टप्प्यांची मदत होते. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर हा स्तनांच्या कॅन्सरचा अगदी सुरूवातीचा टप्पा आहे. या टप्प्यात कॅन्सरचं निदान झालेले रूग्ण बरे होतात. हा कॅन्सर शरीराच्या इतर भागात पसरला नसल्यामुळे रूग्ण वाचण्याची शक्यता बरीच जास्त असते. ब्रेस्ट कॅन्सर शरीराच्या कोणत्या भागात पसरला आहे किंवा त्याचा किती धोका आहे हे टप्प्यांवरून कळतं. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर धोकादायक नसतो. या टप्प्यात कॅन्सरच्या पेशी स्तनांच्या इतर भागात किंवा शरीराच्या इतर भागात पसरलेल्या नसतात. काही डॉक्टरांच्या मते स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर हा कॅन्सरपूर्व टप्पा आहे. या टप्प्यात रूग्णाला उपचारांची नाही तर निरिक्षणाची गरज असते. अनेकदा इतर चाचण्या करताना स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरचं निदान होतं. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरमध्ये स्तनांमध्ये गाठ तयार होतेच असं नाही. तसंच ब्रेस्ट कॅन्सरची इतर लक्षणं या टप्प्यात दिसतातच असंही नाही. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सर शरीरात पसरला नसला तरी भविष्यातला धोका टाळण्यासाठी उपचारांची गरज असते. उपचारांअभावी हा कॅन्सर शरीरात पसरू शकतो. त्यामुळे वेळीच योग्य ते उपचार होणं गरजेचं असतं. स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरच्या प्रकारावरून उपचारांची दिशा ठरवली जाते. योग्य उपचार घेतल्यानंतर स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरच्या १० रूग्णांपैकी नऊ रूग्ण बरे होतात आणि सर्वसामान्य आयुष्य जगू शकतात. ब्रेस्ट कॅन्सरचा कौटुंबिक इतिहास, वय, स्थूलपणा, मुलं नसणं, बैठी जीवनशैली, अतिमद्यपान, स्तनांमध्ये होणारे बदल, मासिक पाळीसंबंधीच्या समस्या, गर्भनिरोधक गोळ्यांचं सेवन या कारणांमुळे स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरचा धोका वाढतो. स्तनांमध्ये गाठी तयार होत नसल्याने स्टेज झीरो ब्रेस्ट कॅन्सरचं निदान पटकन होत नाही.

आरोग्यवेध


---

## अवयवांची स्वच्छता राखताना...

शारीरिक स्वच्छता राखताना नेमकं काय करायला हवं याविषयी...

✻ स्वच्छतागृहाचा वापर केल्यावर, काही खाण्याआधी तसंच खाल्ल्यानंतर किंवा बॅक्टेरिया असलेल्या भागाला स्पर्श केल्यानंतर हात स्वच्छ धुवायला हवेत. पण प्रत्येक वेळी बॅक्टेरियाविरोधी हँडवॉश किंवा साबण वापरण्याची गरज नसते. हात धुण्यासाठी कोणताही साबण वापरत असलात तरी तो किमान २० सेकंद हातांना नीट चोळायला हवा. तसंच बोटांच्या मध्ये, नखांच्या जवळ आणि हातांच्या मागच्या बाजूलाही साबण लावायला हवा. यामुळे हात नीट स्वच्छ होतील.

✻ चेहऱ्यासाठी आपण वेगवेगळ्या प्रकारची स्क्रब्ज वापरतो. हे स्क्रब वरचेवर वापरल्यामुळे चेहरा खराब होऊ शकतो. चेहऱ्याची मृत त्वचा वारंवार निघते. यामुळे त्वचा कोरडी पडू शकते. हे टाळण्यासाठी तोंड सौम्य फेसवॉशने धुवायला हवं. फेसवॉश चेहऱ्यावर नीट लावायला हवा.



✻ अनेक लोक योग्य पद्धतीने दात घासत नाहीत. अस्वच्छतेमुळे तोंडात आम्लांचं असंतुलन निर्माण होतं आणि दातांवरचं एनामल कमी होतं. हे टाळण्यासाठी ब्रश दातांसमोर ४५ अंशांच्या कोनात धरायला हवा. दातांवर तो गोलाकार फिरवायला हवा.

आपण कुठे चुकतो?

✻ कान स्वच्छ करण्यासाठी आपण पेन किंवा काडेपेटीच्या काडीचा वापर करतो. यामुळे कानांच्या पडद्यांना इजा पोहचू शकतो. अशा गोष्टींच्या वापरामुळे माणूस बहिराही होऊ शकतो. कानांच्या आतल्या भागाला स्वच्छतेची गरज नसते. हा भाग आपोआप स्वच्छ होत असतो. तुम्हाला कानांचा बाहेरचा आणि मागचा भाग स्वच्छ करायचा असतो. कानांचा मागचा भाग स्वच्छ करणंही खूप गरजेचं असतं.

✻ केस धुताना टाळूकडे दुर्लक्ष होतं. लांब आणि जाड केस असलेले लोक टाळूच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करतात. अनेकदा शँपू आणि कंडिशनर तसाच राहतो. जाड केस असणाऱ्यांनी सौम्य शँपूने टाळूवरची त्वचाही धुवायला हवी.

✻ बेंबीचा भागही स्वच्छ धुवायला हवा. बेंबीमध्ये जीवाणूंचा वास असतो. पण आंघोळ करताना आपण बेंबी स्वच्छ करायला विसरतो. कोमट पाणी आणि साबणाने बेंबी स्वच्छ करायला हवी. बेंबी स्वच्छ करण्यासाठी कापसाच्या बोळ्याचा वापर करता येईल.

---

नवसंशोधन

### आहारातलं लाभदायी फायबर

फळं, भाज्या, पूर्ण धान्य यामध्ये आढळणारं फायबर आरोग्यासाठी उपयुक्त असल्याची बाब एका संशोधनातून समोर आली आहे. या फायबरमुळे वय वाढताना होणारा मेंदूचा दाह कमी होतो, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. आहारातून मिळणाऱ्या फायबरमुळे पोटात चांगल्या बॅक्टेरियांची निर्मिती होते. हे बॅक्टेरिया फायबर पचवतात. त्यावेळी शॉर्ट चेन फॅटी ॲसिड्सची निर्मिती होते. यात बटीरेटचाही समावेश असतो. बटीरेटमध्ये दाह कमी करण्याचे गुणधर्म असल्याची बाब समोर आली आहे. युनिव्हर्सिटी ऑफ इलिनॉइसच्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. उंदरांवर संशोधन करण्यात आलं. बटीरेटमुळे उंदराची स्मरणशक्ती सुधारल्याची बाबही समोर आली आहे.




डोळ्यांचं आरोग्य

### इलेक्ट्रॉनिक उपकरणं ठरतात मारक

स्मार्टफोन, लॅपटॉप्स तसंच इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधून बाहेर पडणारा निळा प्रकाश डोळ्यांसाठी घातक असल्याचं अनेकदा बोललं गेलं आहे. ही बाब संशोधनातूनही समोर आली आहे. या निळ्या प्रकाशाच्या सततच्या संपर्कामुळे अंधत्त्व येऊ शकतं, असं शास्त्रज्ञांनी म्हटलं आहे. अर्थात हा अभ्यास उंदरांवर करण्यात आला. या संशोधनात निळ्या प्रकाशाच्या धोक्यांबद्दल सांगण्यात आलं आहे. मोबाईलचा अतिवापर शरीरावर वेगवेगळ्या प्रकारे प्रभाव टाकू शकतो. डोळे कोरडे होणं, डोळ्यांमधून पाणी येणं, झोप न येणं अशा धोक्यांवर या संशोधनातून प्रकाश टाकण्यात आला आहे.



दंतारोग्य

### वापरा इलेक्ट्रॉनिक ब्रश

दात घासताना आपण बऱ्याच चुका करतो. हे टाळण्यासाठी आपण इलेक्ट्रिक ब्रशचा वापर करू शकतो. इलेक्ट्रिक ब्रशमुळे दाताचा प्रत्येक कोपरा स्वच्छ होतो. विशेष बाब म्हणजे आपले दात वैज्ञानिक पद्धतीने स्वच्छ होतात. बटण दाबल्यानंतर ब्रशचं काम सुरू होतं. दातांमध्ये अडकलेले सगळे कण निघून जातात आणि तोंडाच्या बऱ्याच समस्याही कमी होतात. त्यामुळे वेगळा प्रयोग म्हणून इलेक्ट्रॉनिक ब्रशचा वापर करायला हरकत नाही.



आजीबाईंचा बटवा

### उपयुक्त चंदनाचं तेल

चंदनाचं तेल आणि चंदनाची पूड विविध औषधांमध्ये तसंच सौंदर्यप्रसाधनांमध्ये वापरली जाते. गेल्या चार हजार वर्षांपासून चंदनाचा वापर केला जात आहे. चंदनाच्या तेलामुळे शरीराला थंडावा मिळतो. दाह, जळजळ कमी होते. चंदनामुळे पचनशक्ती सुधारते. पोटातल्या गॅसचं प्रमाण कमी होतं. नव्याने गॅस तयार होत नाही. जखमा बऱ्या करण्याचे गुणधर्मही यात असतात. खोकला तसंच बसलेल्या घश्यासाठीही चंदनाचं तेल वरदान मानलं जातं. रक्तदाब कमी करण्यासाठी चंदनाचं तेल दुध किंवा पाण्यासोबत घेता येईल.

